RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२६२ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२१ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सरकारला प्रश्न विचारल्याने खासदारांना निलंबित केले ; शरद पवारांच केंद्र सरकारवर हल्ला बोल

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेच्या सुरक्षेच्या मुद्द्यावरुन लोकसभा आणि राज्यसभेतील विरोधी पक्षांच्या खासदारांनी आक्रमक पवित्रा घेतला. यामुळे लोकसभा आणि राज्यसभेतील मिळून १४३ खासदारांचं निलंबन करण्यात आलंय. यावरुन आता राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार शरद पवार यांनीही यावरुन भाजपवर जोरदार टीका करत कारवाई मागचं कारण सांगितलं.



संसदेचे सदस्य नसताना काही लोक सदनमध्ये आले, या लोकांना पास कुठून मिळाला. ते सदनमध्ये कसे आले? याबाबत सरकारकडून माहिती मिळण्याची आवश्यक्ता होती. सदनचा तो अधिकार होता, आम्ही स्टेटमेंटची मागणी केली होती तेच त्यांनी दिलेली नाही. यामुळेच सदनमधील सदस्यांना निलंबित केलं, आजपर्यंत अशी गोष्ट कधीही झालेली नाही, असा आरोप खासदार शरद पवार यांनी आज केला.

खासदार शरद पवार म्हणाले, सध्या विरोधी पक्षाला दुर्लक्ष करुन काम करणे सुरू आहे. पण, देशाची जनता हे सर्व पाहत आहे. जी मिमिक्री केली ती सदनच्या बाहेर केली आहे. संसदेत बोलू दिले जात नाही. खासदारांनी सरकारला प्रश्न विचारले म्हणून त्यांना निलंबित केलं. खासदारांचं असं निलंबन करणं चुकीचं आहे, असंही खासदार पवार म्हणाले. लोकसभेने आतापर्यंत १४१ खासदारांचे निलंबन केले आहे. या खासदारांविरोधात आता आणखी एक कारवाई केली आहे. मंगळवारी लोकसभा सचिवालयाने एक परिपत्रक जारी केले आहे. यात निलंबित करण्यात आलेल्या खासदारांना संसदेच्या चेंबर, लॉबी आणि गॅलरीमध्ये जाण्यास मनाई केली आहे.

## विरोधी खासदारांचे निलंबन दुर्दैवी, नक्कल केलेला व्हिडिओ व्हायरल करणे चुकीचे: मायावती

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसद सुरक्षेतील त्रुटी आणि लोकसभेतील घुसखोरी यांवरून विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत. गृहमंत्र्यांनी दोन्ही सभागृहात यासंदर्भात निवेदन द्यावे, अशी मागणी विरोधकांनी लावून धरली आहे. या मागणीवर लोकसभा आणि राज्यसभा या सभागृहातील गोंधळाप्रकरणी विरोधी पक्षातील १४३ खासदारांचे निलंबन करण्यात आले आहे. या निलंबनावरून सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली जात आहे. यातच आता बसपा सुप्रिमो मायावती यांनी प्रतिक्रिया देताना विरोधी पक्षातील खासदारांचे निलंबन करणे दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे.



प्रसारमाध्यमांशी बोलताना मायावती म्हणाल्या की, विरोधी पक्षातील खासदारांचे निलंबन दुर्दैवी आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहातील खासदारांचे निलंबन हे संसदीय इतिहासासाठी दुःखद आणि लोकांच्या विश्वासाला धक्का आहे, अशी टीका मायावती यांनी केली. तसेच संसद परिसरात निलंबित खासदारांनी उपराष्ट्रपतींची खिल्ली उडवत नक्कल केलेला व्हिडिओ व्हायरल होत आहे. ही बाबही अयोग्य आणि अशोभनीय आहे, या शब्दांत मायावतींनी विरोधकांचेही कान टोचले आहेत.

दरम्यान इंडिया आघाडीच्या बैठकीबाबत बोलताना मायावती म्हणाल्या की, या आघाडीत नसल्याबाबत कोणतीही टिप्पणी करू इच्छित नाही. माझा सल्ला आहे की, असे करणे टाळावे. कारण देशाच्या हितासाठी भविष्यात कोणत्या पक्षाला कोणाची कधी गरज भासेल, हे सांगता येत नाही. अन्यथा मोठा पेच निर्माण होऊ शकतो. विशेषतः समाजवादी पक्षाने याबाबत काळजी घ्यावी. भविष्यात गरज कधी निर्माण होईल? याचे समाजवादी पक्ष हे जिवंत उदाहरण आहे, असे मायावती यांनी म्हटले आहे.

## राम मंदिर सोहळ्याचे रामनाथ कोविंद, प्रतिभाताई पाटील सोनिया गांधी, खरगेंना आमंत्रण

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येतील राम मंदिरातील मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची सध्या देशभरात चर्चा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, तसेच अन्य महत्त्वाच्या व्यक्तींना या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे. दरम्यान, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टतर्फे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, तसेच काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांनादेखील या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्या येथे हा कार्यक्रम होणार आहे.



भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनादेखील निमंत्रण पाठवण्यात आले आहे.

**उपस्थितीची शक्यता कमी**

सूत्रांच्या माहितीनुसार राम मंदिर बांधकाम समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा, संघाचे अखिल भारतीय संपर्कप्रमुख राम लाल, विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष आलोक कुमार यांनी सोनिया गांधी आणि खरगे यांची भेट घेत या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आमंत्रण दिले आहे. मात्र, काँग्रेसमधील सूत्रांच्या माहितीनुसार सोनिया गांधी, तसेच खरगे या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची शक्यता कमी आहे.

**रामनाथ कोविंद, प्रतिभाताई पाटील यांना निमंत्रण**

### राम मंदिर उभारणीसाठी काम करणाऱ्या कामगारांनाही आमंत्रण

राम मंदिराच्या उभारणीसाठी काम करणाऱ्या कामगारांनादेखील आमंत्रित करण्यात आले आहे. तसेच टाटा उद्योगसमूहाचे नटराजन चंद्रशेखरन आणि एल ॲण्ड टी उद्योगसमूहाचे एस. एन. सुब्रह्मण्यन यांनादेखील कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

या शिष्टमंडळाने भारताचे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचीदेखील भेट घेऊन, त्यांना कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले आहे. वेगवेगळ्या राज्यांचे मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांना मात्र या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आलेले नाही.

**प्रत्येक राज्याला विशेष दिवस**

सूत्रांच्या माहितीनुसार मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर मंदिराला भेट देण्यासाठी प्रत्येक राज्याला काही दिवस नेमून दिले जाणार आहेत. भाविकांना येण्यासाठी विशेष रेल्वेगाड्यांचे नियोजन केले जाणार आहे. भाविकांसह येण्यासाठी मुख्यमंत्र्यांनादेखील आमंत्रित केले जाईल. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी विशेष व्यवस्था केली जाणार आहे.

## संसद भवनाच्या सुरक्षेची जबाबदारी आता CISF कडे - गृह मंत्रालयाचा निर्णय

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

लोकसभेचं कामकाज सुरू असताना दोन तरुणांनी सभागृहात घुसून राडा केल्याच्या घटनेनंतर संसदेच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, केंद्र सरकारने संसद भवन परिसराच्या सुरक्षेची जबाबदारी सेंट्रल इंडस्ट्रियल सिक्योरिटी फोर्सकडे (सीआयएसएफ) सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. सीआयएसएफ हे केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आहे, जे देशातील वेगवेगळ्या सरकारी संस्था, मंत्रालयांच्या इमारती, अणूऊर्जा प्रकल्प, अंतराळ संस्थेची ठिकाणं आणि विमानतळांना संरक्षण देतं.



दरम्यान, केंद्रीय गृह मंत्रालयाने सीआयएसएफला संसद भवन संकुलाचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर आता सीआयएसएफ आणि अग्निशमन दल मिळून संसद परिसरात अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यासाठी एक आराखडा तयार करतील. संसदेची सुरक्षा व्यवस्था पाहणाऱ्या सुरक्षा पथकासह सीआयएसएफ संसद भवन परिसराचं सर्वेक्षण करणार आहे. आठवडाभर अभ्यास करून सुरक्षेच्या दृष्टीने एक आराखडा तयार करून गृहमंत्रालयासमोर सादर केला जाईल. सीआयएसएफच्या जवानांबरोबर संसदेची सध्याची सुरक्षेची जबाबदारी पाहणारं पथक, दिल्ली पोलीस आणि सीआरपीएफचं पथक संयुक्तपणे संसद भवनाचं संरक्षण करतील.

### कुस्ती महासंघाची कमान बृजभूषण सिंह यांच्याकडेच?

**दि. २१ विदर्भ प्रजासत्ताक**

रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या निवडणुकीचा निकाल समोर आला असून संजय कुमार सिंह यांनी ही निवडणूक जिंकली आहे. संजय सिंह हे भाजपाचे माजी खासदार आणि कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांचे निकटवर्तीय मानले जातात. रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदासाठी आज (२१ डिसेंबर) निवडणूक पार पडली. संजय सिंह यांनी या निवडणुकीत माजी कुस्तीपटू अनिता शेरॉन यांचा पराभव केला आहे. एकूण ४७ जणांनी या निवडणुकीत मतदान केलं. यापैकी ४० मतं संजय सिंह यांच्या पारड्यात पडली तर अनिता यांना केवळ सात मतं मिळाली आहेत.

## यायचं, बसायचं, न बोलता निघायचं इतकेच काम अधिवेशनात केलं; शिरसाटांचा ठाकरेंना टोला

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

उद्धव ठाकरेंबाबत देवेंद्र फडणवीस जे बोलले ते खरे आहे. नागपूरला यायचं, प्रेससमोर जायचं, पत्रकारांशी बोलायचे, संध्याकाळी आमदारांची बैठक घ्यायची. जेवण, चहाची वेळ झाल्यावर जायचं, केवळ सभागृहात उपस्थिती दाखवली असा टोला शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी ठाकरेंना लगावला.

आमदार संजय शिरसाट म्हणाले की, सभागृहात शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर एवढे बोलले गेले. बाहेर जे पोपटपंची करतात तेच भाषण सभागृहात केले असते. शेतकऱ्यांचा कळवळा दाखवला असता. आरक्षण चाललंय त्यावर बोलले असते. जे मोर्चे निघाले त्यावर सभागृहात भाष्य केले असते तर कदाचित तो मेसेज गेला असता. परंतु आपल्याला जे व्यासपीठ दिलंय, जिथे जनतेचे प्रश्न मांडले जातात तिथे काही बोलायचे नाही. पत्रकार परिषद घेतली म्हणजे आपले काम संपले. सभागृहात केवळ यायचे, बसायचे आणि दर्शन देऊन निघून जायचे इतकेच काम अधिवेशनात उद्धव ठाकरेंनी केले अशी टीका त्यांनी केली.



तसेच संजय राऊतांना बाकीच्या ठिकाणी नाक खुपसता येते. टेंडरमध्ये झालेले घोटाळे माहिती नाहीत. चौकशीचा रोख त्यांच्या दिशेने जातोय. या सर्वांची कल्पना संजय राऊतांना आहे. बाकीचे आठवणार नाही. शिवसैनिकांनी भाजपाकडून स्क्रिप्ट घ्यावी हे शिकलोय का? आम्हाला स्क्रिप्ट वाचण्याची गरज नाही. आम्ही जे बोलतो ते रोखठोक सभागृहात बोलतो. आदित्य ठाकरेंना अटक करून आम्हाला मेडल मिळवायचे आहे का? जर ते दोषी असतील जेलमध्ये जातील. संजय राऊत तुम्ही शरद पवारांची स्क्रिप्ट वाचताय असं प्रत्युत्तर संजय शिरसाट यांनी राऊतांना दिले.दरम्यान, मराठा आरक्षणासाठी सरकार गंभीर आहे. सरकार म्हणून आमची भूमिका आंदोलनकर्त्यांना समजावून सांगतोय. राज्यातील वातावरण बिघडू नये अशी काळजी घेतेय. सरकार जनतेचे आहे. त्यामुळे जनतेशी बोलायला कमीपणा वाटत नाही. संवादातून मार्ग मिळत असेल आणि आरक्षणाचा मुद्दा सुटत असेल तर गैर नाही असं आवाहन आमदार संजय शिरसाट यांनी मराठा आंदोलकांना केले आहे.

### जरांगे पाटील यांच्या नवीन मागणीने सरकारसमोर तांत्रिक पेच

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्य सरकारने न्या. शिंदे समितीचा दुसरा अहवाल स्वीकारला आणि मराठा आरक्षणासाठी आंदोलन करीत असलेले मनोज जरांगे यांनी आपल्या मागणीपत्रात आणखी एका मागणीची भर घातली. आईच्या जातीच्या दाखल्याच्या आधारावरून तिच्या मुलांना देखील जात प्रमाणपत्र देण्याची मागणी जरांगे यांनी केली. या मागणीमुळे सरकारसमोर नवीन पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. आई कुणबी असल्यास मुलाला कुणबी प्रमाणपत्र मिळाले पाहिजे, अशी मागणी जरांगे पाटील यांनी सरकारकडे केली आहे.

## राज्यभरात अनेक ट्रॅक्टर मालकांना १४९ अंतर्गत नोटीसा

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक जालना**

जालना येथील अंतरवाली सराटी इथं उपोषण करून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा राज्यभरात पेटवला. येत्या २४ डिसेंबरपर्यंत मराठ्यांना आरक्षण द्या या मागणीसाठी गेल्या २ महिन्यापासून जरांगे राज्यभरात दौरा करत सरकारला इशारा देत आहे. त्यातच विधिमंडळाच्या नागपूर हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य मागासवर्गीय आयोगाने अहवाल दिल्यानंतर फेब्रुवारीपर्यंत मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन घेऊन असं सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या या विधानानंतर २४ डिसेंबरपर्यंत आरक्षणावर ठोस निर्णय होण्याची शक्यता धूसर झाली आहे. त्यातच आता

### मुंबई तसेच राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडू नये यासाठी पोलीस अलर्ट मोडवर



राज्यभरातून मराठा आंदोलक २४ तारखेला मुंबईत ट्रॅक्टरनं आणून चक्का जाम करणार असल्याची माहिती हाती लागली आहे.

राज्याच्या गृहखात्याला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, राज्यात मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर २४ डिसेंबरला मुंबई येथे कार्यकर्त्यांचा जमाव होण्याची शक्यता आहे. त्यात हा जमाव जमवण्यासाठी राज्यातून विविध भागातून ट्रॅक्टरही वाहने मुंबई आणली जाणार आहेत. विविध भागातून मुंबई ट्रॅक्टर आणल्यास मुंबईच्या वाहतुकीचा मोठा फटका बसणार असून त्यातून लोकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागेल. त्याचसोबत लोकांची गर्दी जमून जाळपोळ, गाड्या फोडणे, रस्ता अडवणे, टायर जाळणे असे प्रकार करून शांतता भंग केली जाण्याची शक्यता असल्याचं पोलिसांना कळाले आहे.

त्यामुळे मुंबई तसेच राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडू नये यासाठी पोलीस अलर्ट झाले आहे. पोलिसांनी राज्यभरात अनेक ट्रॅक्टर मालकांना १४९ अंतर्गत नोटीस पाठवली आहे. या नोटिशीत म्हटलंय की, आपल्याकडे असलेले ट्रॅक्टर शेतीच्या उपयुक्त कामासाठी घेतलेले आहेत. त्याचा वापर शेतीसाठीच करावा. आपल्याकडे कुणीही मराठा समाजाचे नेते, कार्यकर्ते, नागरीक ट्रॅक्टरच्या मागणीसाठी आल्यास त्यांना ट्रॅक्टर देऊ नये आणि स्वत:ही ट्रॅक्टरसोबत घेऊन जावू नये. आपण त्यांना ट्रॅक्टर पुरवल्यास किंवा घेऊन गेल्यास आरक्षण संबंधाने गर्दी होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. त्याचसोबत कुठलीही शांतता भंग करणारी घटना घडल्यास आपल्यावर दखलपात्र गुन्हा दाखल करून सदर ट्रॅक्टर जप्त करण्यात येईल अशी खबरदारीची नोटीस पोलिसांनी बजावली आहे.

## संपादकीय ......

# दादांचा दिलगिरीनामा!

महाराष्ट्र राज्याचे आपण मुख्यमंत्री व्हावे, अशी अतीव इच्छा असलेले आणि सध्या उपमुख्यमंत्री असलेले अजित पवार यांनी नुकतीच पीएचडी करू इच्छिणार्या विद्यार्थ्यांविषयी धक्कादायक विधान केले. त्यामुळे विविध क्षेत्रांतून अजितदादांवर टीका झाली. सोशल मीडियावरून तर दादांविषयी विविध प्रकारच्या बोचर्या प्रतिक्रिया व्यक्त करताना काही जणांनी दादांची यत्ता कंची, म्हणजे दादांचे शिक्षण किती झाले, अशी विचारणा करून संशोधनातले यांना किती कळते इतकी खोलवर विचारणा केली. त्याचसोबत अजितदादा सध्या सत्तेत आहेत, त्यामुळे विरोधकांनीही दादांना त्यांच्या या विधानावरून चांगलेच धारेवर धरले. राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदावर असलेली व्यक्ती जर असे गांभीर्यहीन विधान करत असेल, तर शिक्षण आणि त्यातही संशोधन क्षेत्राचे काही खरे नाही, अशा तिखट प्रतिक्रिया विरोधकांकडून आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आल्या. आपण जे संतापाने बोललो ते आपल्यावर भलतेच उलटले आहे हे लक्षात आल्यावर दादांनी आपल्या विधानाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. त्याचसोबत आपल्याला तसे बोलयचे नव्हते. आपल्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला, अशी राजकीय सदरात मोडणारी सफाईदार टिपण्णी केली. दादा सध्या राज्याचे अर्थमंत्रीदेखील आहेत. त्यामुळे विधान परिषदेमध्ये पीएचडी करणार्या विद्यार्थ्यांसाठी निधी वाढवून देण्याची मागणी केली असता यावर उसळलेले दादा म्हणाले, पीएचडी करून विद्यार्थी काय दिवे लावणार आहेत? दादांच्या या विधानामुळे अनेकांना धक्का बसला. अशी धक्कादायक विधाने करून ती आपल्यावर उलटल्याचे लक्षात आल्यावर दिलगिरी व्यक्त करण्याची दादांची ही काही पहिलीच वेळ नाही. कधी पत्रकारांनी काही अवघड प्रश्न विचारले की त्यांना कॅमेर्यासमोरच जाहीरपणे झापणे, त्यांना उडवून लावणे यावरून दादा वादात सापडले होते. दादांनी पाऊस पडत नाही तर धरणात काय लघुशंका करायची का, हे जाहीर सभेमधून केलेले विधान तर त्यांच्या भलतेच अंगाशी आले होते. शेवटी त्यांनी संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन नाक घासले आणि आत्मक्लेश करून घेतला.

अजित पवार हे तसे दिलदार नेते आहेत, असाच अनेकांचा अनुभव आहे. प्रशासनावर त्यांचा वचक आहे. त्यामुळे कुणीही त्यांच्याकडे काही काम घेऊन गेले तर ते पटापट मार्गी लागते. पोटात एक आणि ओठात एक असे दादांना जमत नाही. त्यात पुन्हा दादांचा स्वभाव तसा भाबडा आहे. मागे त्यांना पत्रकारांनी विचारले, दादा तुम्ही दिल्लीत जाणार का, त्यावर ते म्हणाले होते, नको रे बाबा, माझी बहीण दिल्लीत आहे तेवढे पुरे आहे. मी आपला इथेच बरा आहे. दादांनी जेव्हा धरणातील पाण्याविषयी विधान केले होते, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची मुलाखत झाली होती. त्यावेळी त्यांना अजितदादांच्या त्या वादग्रस्त विधानाविषयी विचारले होते. तेव्हा ते म्हणाले होते की, जेव्हा तुम्ही सत्तेतील पदांवर असता तेव्हा तुम्ही कुठलेही विधान करताना फार काळजी घ्यावी लागते. कारण तुम्ही एक जबाबदार व्यक्ती असता. त्यामुळे तुम्हाला जबाबदारीने बोलावे लागते. आपल्या जबाबदारीचे भान ठेवावे लागते. नाहीतर सामाजिक जीवनात तुम्हाला त्याची मोठी किंमत मोजावी लागते, पण काकांचा हा सल्ला अजितदादांनी किती मनावर घेतला आहे हे काही कळायला मार्ग नाही. कारण त्यांचा दिलगिरीनामा काही संपायचे नाव घेत नाही. दादांनी मागे एकदा जाहीर सभेतून आम्ही आहोत टगे, असे विधान केले होते. पुढे त्यांचे विरोधक त्याच नावाने त्यांना संबोधू लागले. नेत्याला लोकांनी आपला प्रतिनिधी म्हणून निवडून दिलेले असते. त्यामुळे त्यांच्याकडून लोकहिताचे निर्णय घेतले जाणे अपेक्षित असते. त्यामुळे त्यांच्याकडे तितकेच गांभीर्य असणे आवश्यक असते. महत्त्वाच्या पदावर असलेला लोकप्रतिनिधी जर हलकी भाषा करू लागला तर त्याच्याविषयी लोकही मग गांभीर्याने विचार करणे सोडून देतात. आजच्या तारखेला राज्याच्या राजकारणात अशी उदाहरणे आहेत. गांभीर्य नसेल तर मग त्यांच्या पक्षातील शीर्षस्थ नेतेही मग अशा मंडळींना महत्त्वाची पदे देत नाहीत.

अजितदादा यांना राज्याचे मुख्यमंत्री व्हायचे आहे. हे त्यांनी वेळोवेळी बोलूनही दाखवले आहे. इतकेच काय पण त्यासाठी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून बंड करून पक्षावर दावा सांगितला. त्यानंतर भाजप आणि शिंदे यांच्या सरकारसोबत हातमिळवणी करून त्यांनी सत्तेत महत्त्वाचे स्थान मिळवले, पण दादांनी ज्या पदासाठी काकांशी बंड केले, ते पद त्यांना मिळाले नाही. इतकेच नव्हे तर त्यांना आमच्यासोबत घेताना मुख्यमंत्रीपदाचे वचन दिलेले नव्हते, जे त्यांना सांगितले होते ते त्यांना दिलेले आहे, असे भाजपचे राज्यातील मुख्य नेते देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केल्यामुळे आता पुन्हा दादांची पंचाईत झालेली आहे. फडणवीस आणि शिंदे यांच्याकडे बहुमत आहे. त्यामुळे मी त्यांच्याकडे कशाला जाऊ, स्टॅम्प पेपरवर लिहून देऊ का, अशी दादा पत्रकारांची खिल्ली उडवत असत. असे असताना दादा तिकडे गेलेच कशाला, या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरित आहे. दादांनी आपल्या सहकार्यांचे जागावाटप अगोदर जाहीर केले. ना मुख्यमंत्रीपदाची खात्री, ना जागावाटपाची, त्यामुळे दादांना पुन्हा एकदा झालेल्या चुकीबद्दल काकांकडे दिलगिरी व्यक्त करावी लागेल की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली तर आश्चर्य वाटू नये.

# अध्ययन प्रक्रिया व्यवस्थापन प्रशिक्षणामध्ये

# मनपा आयुक्त देविदास पवार यांनी घेतले प्रशिक्षणाचे धडे



**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – अमरावती महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रशिक्षणाचे आयोजन दिनांक १३ डिसेंबर ते १८ डिसेंबर ,१९ ते २३ डिसेंबर , २६ ते ३० डिसेंबर २०२३ असे तीन टप्यात करण्यात आले आहे .या प्रशिक्षणात इयत्ता १ते ५ च्या सर्व व्यवस्थापनाच्या ६७१ शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. या अनुसार प्रशिक्षणाचा पहिला टप्पा दिनांक १३ डिसेंबर ते १८ डिसेंबर २०२३ या दरम्यानश्री समर्थ हायस्कूल अमरावती, येथे सुरू झालेला आहे. यामध्ये १५० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहे

सदर प्रशिक्षणाला अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त मा देवीदासजी पवार, शिक्षणाधिकारी मनपा मा डॉ प्रकाश मेश्राम , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता मा दीपक चांदुरे यांनी भेट दिली.

भेटी दरम्यान मा. देविदासजी पवार यांनी मनपा क्षेत्रातील शाळांनी प्रशिक्षणाच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गती वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन केले. शिक्षक समाज घडवू शकतो त्यामुळे २१ व्या शतकाची आव्हाने स्वीकारून त्या अनुषंगाने शिक्षकांनी प्रशिक्षणाचा लाभ घेऊन जागतिक दर्जाचे विद्यार्थी घडवावे असे आवाहन शिक्षकांना केले. त्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय मदत महानगरपालिका प्रशासन करेल असे आश्वासन दिले. आयुक्त पवार यांनी एक तासिका शिक्षकांमध्ये बसून प्रशिक्षणाचे घटक जाणून घेतले.

प्रशिक्षणाला शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांनी आव्हान पुस्तिका योग्य प्रकारे सोडवून शिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना करून देण्याचे आवाहन शिक्षकांना केले.

डाएट अधिव्याख्याता मा दीपक चांदुरे यांनी प्रशिक्षणाला भेट देऊन प्रशिक्षणार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच प्रशिक्षणाचा लाभ शेवटच्या विद्यार्थ्याला होत नाही तोपर्यंत प्रशिक्षण विसरू नका असे आवाहन केले. प्रशिक्षणाचे आयोजन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी समग्र शिक्षण पंकज कुमार सपकाळ, श्री योगेश राणे, श्री संजय बेलसरे, काझी निजामुद्दीन यांनी केले. प्रशिक्षणामध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून कु. सुषमा दुधे, शुभांगी सुने, दिपाली दळवी, मो मुजाहिद, श्री प्रवीण वानखडे, कु माया पवार, श्री अतहर अहमद, प्रियंका हंबर्डे हे काम करीत आहे.

# मुलीचा जन्म १ एप्रिलनंतर झाला का?

# एक लाखांचा मिळणार लाभ !

## १८ वर्षापर्यंत पाच टप्प्यात ठराविक रक्कम मिळणार




**दि २१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** मुलींचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन तथा खात्री देणे, मुलींच्या शिक्षणाला चालना मिळावी, यासह मुलींचा मुत्यूदर कमी करंणे व बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे व शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शुन्यावर आणणे, यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना सुरु केली आहे. राज्य शासन १ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या १८ वर्षापर्यंत पाच टप्यात एक ठराविक रक्कम देणार आहे.लाभार्थींचे कुटुंब बैंक खाते महाराष्ट्र राज्यात असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखांपेक्षा जास्त नसावे. प्रशासकीय यंत्रणेने अर्जाची प्रक्रिया दोन महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे. लाभार्थींची ओळख पटल्यानंतर लाभाची रक्कम वेट लाभार्थ्यांच्या बैंक खात्यात जमा केली जाईल.

### कागदपत्रे काय लागणार?

जन्माचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स, रेशन कार्डची साक्षांकित प्रत, मतदान ओळखपत्र, शाळेचा दाखला आदी.

### लाभासाठी कोठे संपर्क साधाल?

नागरी व ग्रामीण बालविकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) आदी कार्यालयात अर्ज उपलब्ध होतील. कार्यक्षेत्रातील अंगणवाडी सेविका लाभार्थ्यांकडून अर्ज भरुन घेऊन तो पर्यवेक्षिका यांचेकडे सादर करु शकतील.

### किती टप्यात, मिळणार एक लाख एक हजार?

जन्मानंतर ५ हजार रुपये, पहिलीत ६ हजार, सहावीत ७ हजार, अकरावीत ८ हजार तर, १८ वर्ष झाल्यानंतर ७५ हजार रुपये.

# आरोग्य संपदा आहार




## हिवाळ्यात तंदुरुस्त राहण्यासाठी दिवसातून फक्त १० मिनिटे करा हा व्यायाम

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळा सुरू झाला आहे आणि फिटनेस राखणे खूप कठीण झाले आहे. व्यायामासाठी वेळ काढणे हे त्याहूनही मोठे आव्हान आहे आणि जास्त वेळ वर्कआउटपासून दूर राहिल्याने लठ्ठपणा आणि इतर अनेक समस्या उद्भवू शकतात.



मग काय करावे जेणेकरुन तुम्ही या समस्या टाळू शकाल आणि तंदुरुस्त देखील राहू शकाल. याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे चालणे. होय, दररोज फक्त १० मिनिटांच्या चालण्याने तुम्ही हिवाळ्यातही तंदुरुस्त राहू शकता.

**दररोज चालण्याचे फायदे**

**१. हाडे निरोगी राहतात**

दररोज चालण्याने गुडघेदुखीपासून आराम मिळू शकतो. बसणे, सतत झोपणे आणि शारीरिक हालचाली कमी केल्याने गुडघ्यांना हळूहळू नुकसान होते. त्यामुळे चालण्याने हा धोका कमी होऊ शकतो. नियमित चालणे विशेषतः ऑस्टिओपोरोसिसच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर आहे.

**२.मूड चांगला राहतो**

जे लोक रोज चालतात ते केवळ हृदयानेच नव्हे तर मनानेही निरोगी राहतात. सकाळी चालण्याने मेंदूला ताजा ऑक्सिजन मिळतो ज्यामुळे तणाव आणि नैराश्य दूर होते.

**३. रोगांपासून मुक्तता**

दररोज चालण्याने कर्करोग आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्यांचा धोका बर्याच प्रमाणात कमी होतो. चालणे ही केवळ वृद्धांसाठीच नाही तर तरुणांसाठी आणि अगदी लहान मुलांसाठीही खूप फायदेशीर ॲक्टिव्हिटी आहे. जर वृद्ध व्यक्ती आठवड्यातून फक्त एक तास चालत असतील तर ते दीर्घकाळ निरोगी राहू शकतात.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

– तुमच्या वयाच्या लोकांसोबत फिरायला जा. त्यामुळे चालणे कंटाळवाणे वाटणार नाही.

– घरापासून जवळ असलेल्या ठिकाणी फिरायला जा.

– खडबडीत जागी फिरू नका.

– चालताना पाण्याची बाटली आणि हलका नाश्ता सोबत ठेवा.

– चालण्यासाठी नेहमी योग्य आकाराचे बुटं घाला.

– चालण्यासाठी खूप घट्ट किंवा खूप सैल कपडे घालू नका.

– तापमान आणि प्रदूषणावर लक्ष ठेवा.


# शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती उत्सवानिमित्त एक सूर एक ताल

## ४ हजार विद्यार्थी विद्यार्थीनीचा सहभाग घेतला

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी–** शिवाजी हायस्कूलच्या प्रांगणावर शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती उत्सवानिमित्त एक सूर एक ताल नृत्य गायनाचा आविष्कार कार्यक्रम संपन्न झाला

वरुड ,मोर्शी ,चांदूर बाजार तालुक्यातील शिवाजी शिक्षण संस्थेच्या ४ हजार विद्यार्थी विद्यार्थीनीचा सहभाग घेतला होता

एक सूर एक ताल या कला आविष्कार कार्यक्रमात सर्वप्रथम ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर संत गाडगेबाबा व डॉ पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते केले. या कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष एड. जयवंत पाटील, प्रमुख अतिथी हेमंत काळमेघ, प्राचार्य महेंद्र ढोरे, पंडित पंडागडे, शिवाजी संस्थाचे विविध आजीव सभासद उपस्थित होते.एक सूर एक ताल कार्यक्रमात डॉ. राजेश उमाळे याच्या संगीत संचने सात गाण्याच्या माध्यमातून डॉ पंजाबराव देशमुख यांना व उपस्थितांना मानवंदना दिली

# केशराचे मोल असणारी पानपिंपरी बुरशीने मातीमोल काढणीच्या काळात अवकाळी, ढगाळ वातावरण मुळावर

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :**आयुर्वेदिक गुणांमुळे वेगळेपण असणारी पानपिंपरी नेहमी ४०० रुपये किलो दराने विकली जाते. यंदा मात्र काढणी काळात अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण व वातावरणातील आर्द्रता यामुळे पानपिंपरीवर बुरशीचा अटॅक झाला. त्यामुळे उत्पादकांच्या हातातोंडचा घास हिरावला गेला आहे. ४०० रुपये किलोप्रमाणे मागणी असताना २०० रुपये किलोने विकली जात असल्याचे वास्तव आहे.

कफसायरपसह अन्य आयुर्वेदिक औषधांमध्ये वापर केला जात असलेल्या पानपिंपरीचे उत्पादन अंजनगाव सुर्जी तालुक्यात प्रामुख्याने घेतले जाते. जून महिन्यात याची लागवड केली




जाते व एकरभरात साधारणपणे ७ क्विंटलपर्यंत उत्पादन होते. या पिकाचा उत्पादनखर्चदेखील एकरी तीन ते साडेतीन लाखांच्या घरात आहे. अशा परिस्थितीत उत्पादन खर्चदेखील निघणे कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाने अनुदान द्यावे, अशी उत्पादकांची मागणी आहे.

# कोरोनासारखीच लक्षणे; पॉझिटिव्ह 'सारी, इली' नमुन्यांची 'जिनोम' तपासणी

## आरोग्य विभागाच्या सहसंचालकांच्या यंत्रणेला सूचना

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** केरळमध्ये जेएन.१ या कोरोनाच्या व्हेरियंटची रुग्णसंख्या वाढत आहे व मंगळवारी ठाण्यातदेखील नोंद झालेली आहे. याच दरम्यान केरळ व कर्नाटकमध्ये पाच रुग्णांचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर राज्याच्या आरोग्य विभागाने सूचना दिल्या आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून कोरोनासारखेच लक्षणे असणाऱ्या 'इली व सारी'च्या रुग्णांचे पॉझिटिव्ह नमुने चाचणीसाठी नागपूर येथे जनुकीय संरचना तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत.



तसे आदेश पुणे येथील आरोग्य सहसंचालकांनी जिल्हा यंत्रणेला दिले आहे. त्या अनुषंगाने सुपर स्पेशॉलिटी व जिल्हा रुग्णालयातील काही रुग्णांचे नमुने 'जिनोम सिक्केसिंग'साठी पाठविण्यात आलेले आहे व आता रोज १० च्यावर नमुने विद्यापीठाच्या प्रयोगशाळेत आरटीपीसीआर चाचणीसाठी येत असल्याची माहिती या विभागाने दिली. केरळ, कर्नाटकनंतर राज्यातदेखील या व्हेरियंटच्या रुग्णांची नोंद झालेली आहे. यापूर्वीच्या बीए.२.८६ पेक्षा सध्याचा जेएन.१ हा व्हेरियंट एक म्युटेशन जास्त असल्याचे आरोग्य यंत्रणेद्वारा सांगण्यात आले.

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा –prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# आणखी आठ गावांना मालखेड तालावावरून पाणी

## चांदूरवासीयांना करावी लागणार पायपीट?

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक चांदुररेल्वे–** गेल्या अनेक वर्षांपासून चांदूर रेल्वे शहराची वाढीव पाणी पुरवठा मागणी प्रलंबित असताना पहिले तालुक्यातीलच पाच आणि आता तालुक्याच्या बाहेरील इतर आठ गावांना मालखेड तालावरील पाणी दैनंदिन वापरासाठी देणार असल्याचे माहिती पुढे आली आहे. त्यामुळे आता पहिलेच चार दिवसाआड पाणी मिळणार्या चांदूर रेल्वे शहरवासीयांना पाण्यासाठी पायपीट करावी लागणार आहे. सर्वसामान्यांना ही बाब उशिरा समजत असली तरी सर्वच लोकप्रतिनिधी मात्र याबाबत गप्प का अस प्रश्न निर्माण होत आहे. काही वर्षाअगोदर पाण्याचा प्रचंड दुष्काळ सोसला असताना अतिरिक्त पाणी पुरवठा योजनेतुन जलजीवन मिशन अंतर्गत मालखेड तालावावरून चिरोडी, सावंगी मग्रापुर, कारला, थुगाव, पाथरगाव या ५ गावाकरीता प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेला तांत्रिक मान्यता देवून जलदगतीने प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.त्यासाठी शहर काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात आले होते.

त्याची कुठलीही दखल प्रशासनाने घेतली नाही तर सोबतच अमरावती जिल्ह्यातील आणखी आठ गावांना दैनंदिन वापरासाठी ०.६२४ दलघमी पाणी सोडण्यात येणार असल्याचे पाटबंधारे विभागाकडून समजते. यावरून चांदूर रेल्वे शहरावरील अन्यायाची परंपरा कायम ठेवत शहराचे हक्काचे पाणी पळविल्या जात असल्याचा आरोप शहरवासीयांकडून केल्या जात आहे. चांदूर रेल्वे शहराला मालखेड तलावावरून गुरुत्वाकर्षणाने पाणी पुरवठा होत आहे, शहराची क्षेत्रवाढ होऊन त्यासाठी अतिरिक्त पाण्याची मागणी नगर परिषदेने केली होती.

परंतु, शहराची ही वाढीव पाणीपुरवठा मागणी शासनाने अमान्य केली आहे तर दुसरीकडे त्याचवेळी या गावांसाठी अतिरिक्त पाण्याची मागणी पूर्ण करण्यात येणे, ही चांदूरवासीयांवर अत्यंत क्रुर अन्याय करणारी बाब असल्याचे अनेकांनी मत व्यक्त केले आहे.

### रब्बीसाठी करावे लागले आंदोलन

यावर्षी चांगला पाऊस झाला असताना मालखेड तलाव ८० टक्केच भरला गेला. त्यामुळे रब्बीसाठी पाणी मिळवण्यासाठी शेतकर्यांना आंदोलन करावे लागले होते. आता याच तलावावरून तालुक्यातील आणि तालुक्याबाहेरील इतर गावांनाही पाणी देण्यात येत असल्याने शेतकर्यांचे पुढील भविष्य संकटात येणार असल्याची ही चर्चा तालुक्यात होत आहे.

### मतदार संघाच्या बाहेरील गावांना पाणी

शहराचे हक्काचे पाणी असलेले तसेच सिंचनासाठी मिळत असलेले पाणी आता तालुक्यातील पाच गावे त्यामध्ये चिरोडी, सावंगी मग्रापुर, थुगाव, कारला, पाथरगाव या गावांना ०.४१७ दलघमी सोडण्यात येणार आहे. याशिवाय आता त्याच योजनेतून पुन्हा अमरावती तालुक्यातील भानखेड बु., भानखेड खुर्द, मोगरा, कस्तूरा, अहमदपूर, पार्डी, उदखेड, अराआड या ८ गावांना ०.६२४ दलघमी पाणी सोडण्यात येणार आहे.



# दर्यापुरात तुरीला विक्रमी १२,१०० भाव

## तूर खरेदीचा थाटात शुभारंभ

## शेतकर्यांमध्ये संचारला उत्साह

दि.२१विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर ११ कपाशीचे उत्पन्न कमी येणार असल्याचे लक्षात आल्यानंतर शेतकरी निराश झाला होता. तुरीच्या उत्पन्नावर आता भिस्त असल्याचे सांगत शेतकर्याने नवे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली. यातच बुधवारी दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तुरीला सर्वोच्च १२,१०० असा भाव मिळाल्यामुळे शेतकर्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मोठ्या प्रमाणात शेतमालाची उलाढाल होत आहे. गेल्या काही दिवसाआधी सोयाबीनची आवक ही मोठ्या प्रमाणात बाजार समितीत होत होती. आता नुकतीच नव्याने निघालेल्यातुरीची आवक दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये झाली आहे. बुधवारी दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पाटील गावंडे यांनी तूर उत्पादक शेतकरी शकिर पटेल रा. वडाळी सटवाई व अडते देवेंद्र राठी, खरेदीदार अनिस घाणीवले यांचा सत्कार करत तूर खरेदीचा शुभारंभ केला.

नव्या तुरीला १२ हजार १०० रुपये भाव देत तूर खरेदी करण्यात आली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रभाकर पाटील तराळ, संचालक राजू राठी, असिफ खान, बाजार समितीचे सचिव हिम्मतराव मातकर, कोकाटे , अनिस घाणीवाले, संतोष खंडेलवाल, केतन शहा, कृष्णा राठी, गुणवंत पाटील गावंडे, गोपाल बायस्कर, भैयासाहेब देशमुख, उमेश कोकाटे, बाळासाहेब गावंडे आणि अडते, व्यापारी, कास्तकार, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कुत्र्याने कोंबडी खाल्ली, म्हणून तिघांना केले ठार




### पसार बापलेकांना खल्लार पोलिसांनी सकाळी कोकर्डा शिवारातून केली अटक

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर –** कुत्र्याने कोंबडी खाल्लूयाच्या कारणावरून झालेला वाद तिघांच्या मृत्यूचे कारण ठरला. नाचोना (ता. दर्यापूर) येथे चारचाकीने चिरडून मंगळवारी रात्री तिघांना ठार केल्यानंतर पसार बापलेकांना खल्लार पोलिसांनी बुधवारी कोकर्डा शिवारातून अटक केली.

पोलिस सूत्रांनुसार, चंदन राधेश्याम गुजर (३२) व राधेश्याम गोविंद गुजर (६०) अशी आरोपींची नावे आहेत. चंदनने चारचाकी वाहनाने घरापुढे राहणाऱ्या अंभोरे कुटुंबातील अनुसया श्यामराव अंभोरे (वय ६५), श्यामराव लालूजी अंभोरे (७०) व चंदनची काकू अनारकली मोहन गुजर (४३) यांना चिरडून ठार केले. अपघातात शारदा उमेश अंभोरे (३६), उमेश अंभोरे (४२) आणि किशोर श्यामराव अंभोरे (३८, सर्व रा. नाचोना) हे गंभीर जखमी झाले आहेत.

तुझ्या कुत्र्याने माझी कोंबडी का खाल्ली, या कारणावरून शिवीगाळ झाली. त्यावर किशोरने तो कुत्रा माझा नाही, तर मोकाट असल्याचे सांगितले.

किशोर अंभोरे यांना काही वेळाने घराबाहेर मोठ्याने चारचाकी वाहन रेस केल्याचा आवाज आला.

पाठोपाठ किंकाळ्याही ऐकू आल्या. घटनेची दखल घेत पोलिसांनी काही वेळाच्या आतच दोन्ही आरोपीना अटक केली.

सदरची कार्यवाही .विशाल आंनद, पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रा., विक्रम साळी, अपर पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामिण, गुरूनाथ नायडु, उप–विभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनात पो.नि.किरण वानखडे, स.पो.नि.चन्द्रकला मेसरे, पो.उप.नि.संजय शिंदे, मोहम्मद तसलीम, मुलचंद भांबुरकर तसेच पो.स्टे. खल्लार व स्था.गु.शा. येथील पोलीस अमंलदार यांचे संयुक्त पथकाने केली आहे.

# गाडगे बाबांचे नाव असलेल्या विद्यापीठातच अस्वच्छतेचे साम्राज्य, एनएसयूआयचे आंदोलन



**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती: –** वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा यांनी आयुष्यभर स्वच्छतेचा संदेश दिला. परंतु त्याच संत गाडगे बाबांचे नाव असलेल्या विद्यापीठात मात्र अस्वच्छतेचे साम्राज्य पहायला मिळत आहे. याला जबाबदार विद्यापीठ प्रशासन आहे. त्यामुळे गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून बुधवारी नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाने (एनएसयूआय) विद्यापीठात स्वच्छता मोहीम राबवत आंदोलन केले. तसेच कुलगुरुंना निवेदन देऊन तातडीने विद्यापीठ परिसराची स्वच्छता करण्याची मागणीही केली.

संत गाडगे बाबा यांनी समाजामध्ये स्वच्छतेचे महत्व पटवून देत आपल्या किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील अंधश्रद्धेची घाण देखील साफ करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या याच कार्यामुळे अमरावती विद्यापीठाला त्यांचे नाव देण्यात आले. परंतु त्याच विद्यापीठ प्रशासनाला गाडगे बाबांच्या विचारांचा विसर पडल्याचा आरोप एनएसयूआयने केला आहे. प्रशासन आणि स्वच्छता ठेकेदाराच्या उदासीनतेमुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने याची दखल घेत विद्यापीठ परिसराची स्वच्छता करण्याची मागणी केली आहे. स्वच्छता न झाल्यास कुलगुरुंच्या दालनामध्ये कचरा टाकण्याचा इशाराही निवेदनातून दिला आहे. यावेळी एनएसयूआयच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठात स्वच्छता मोहीम राबवून विद्यापीठ प्रशासनाचा निषेधही नोंदविला. यावेळी संकेत साहू, समीर जवंजाळ, योगेश बुदीले, राहूल रायबोले, वैभव देशमुख, अनिकेत ढेंगळे, अक्षय साबळे, आकाश गेडाम, वेदांत केणे, अमित महात्मे, आकाश घुराटकर, धीरज बोबडे आदी उपस्थित होते.

# परतवाडा येथून ३३ गावठी बॉम्ब जप्तएका आरोपीला अटक

**दि२१विदर्भ प्रजासत्ताक अचलपूर** :परतवाडा शहरातील आझाद नगरमधून मानवी जीविताला गंभीर धोका निर्माण करणारे ३३ गावठी बॉम्ब स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जप्त केले आहे. याप्रकरणी एका आरोपीला पथकाने ताब्यात घेतले असून, परतवाडा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

जसपालसिंग सोहनसिंग बावरी (४०) रा. आझादनगर परतवाडा, असे आरोपीचे नाव आहे.

जसपालसिंगने त्याच्या घरी स्पोटक पदार्थ (गावठी बॉम्ब) ठेवले असल्याची गुप्तमाहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्या अनुषंगाने गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीच्या घरी छापा टाकून तपासणी केली. त्यावेळी त्याच्या घरी ३३ गावठी बॉम्ब आढळून आले. पोलिसांच्या चौकशीत आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे त्याच्याविरोराधात गुन्हा नोंदविण्यात आला.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक किरण वानखडे, साहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस अंमलदार युवराज मानमोठे, रवींद्र वऱ्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, मंगेश मानमोडे यांनी केली

# दोन दिवसात ३८ उमेदवारांची रिंगणातून माघार

## पाच उमेदवारांची समजूत काढण्यात दोन्ही पॅनल अयशस्वी


**दि.२१विदर्भ प्रजासत्ताकअमरावती –** जिजाऊ कमर्शिअल को ऑपरेटिव्ह बँकेच्या निवडणुकीतून दोन दिवसात ३८ उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे दोन पॅनलचे ३० उमेदवार वगळता ५ उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक लढणार आहे. सद्यस्थितीत १५ संचालक पदाकरीता ३५ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात कायम आहे. गुरुवारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करून त्यांना चिन्हांचे वाटप केले जाणार आहे. जिजाऊ कमर्शिअल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या ३१ डिसेंबरला होऊ घातलेल्या निवडणुकीत ४ डिसेंबरपर्यंत ८६ नामांकन दाखल झाले होते. छाननी दरम्यान १३ नामांकन अवैध ठरवित ७३ पात्र उमेदवारांची यादी ६ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्यामुळे या उमेदवारांना २० डिसेंबरपर्यंत नामांकन अर्ज दाखल करण्यालामुदत देण्यात आली होती. १२ दिवसात एकही उमेदवारांनी नामांकन मागे घेतले नाही. परंतु १३ व्या दिवशी मंगळवारी १५ उमेदवारांनी तर बुधवारी २३ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली. दोन दिवसात ३८ उमेदवारांची नामांकन अर्ज मागे घेतल्याने ३५ उमेदवार रिंगणात कायम आहेत. बुधवारी सकाळी ११ वाजतापासून उपनिबंधक कार्यालयात दोन्ही पॅनलचे प्रमुख रिंगणातील इतर उमेदवारांची समजूत काढून त्यांना नामांकन अर्ज मागे घेण्याची विनवनी करीत होते. दुपारी ३ वाजेपर्यंत दोन्ही पॅनलचे पदाधिकारी उपनिबंधक कार्यालयामध्ये ठाण मांडून बसले होते. अखेर शेवटच्या दिवशी २३ उमेदवारांची समजूत काढण्यास ते यशस्वी झाले. परंतु दोन्ही पॅनलमध्ये ३० उमेदवार वगळता ५ उमेदवार अतिरिक्त असल्याने ते अपक्ष म्हणून या निवडणुकीत उतरणार आहेत. निवडणूक लढविणाऱ्या ३५ उमेदवारांची यादी गुरुवारी प्रसिद्ध करून त्यांना चिन्हांचे वाटप केले जाणार आहे. त्यानंतर प्रचाराच्या रणधुमाळीला सुरूवात होईल.

# जिल्ह्यात टीबीमुक्त भारत अभियानअंतर्गत

## २ हजार ३७३ रुग्णांवर उपचार

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** क्षयरोगमुक्त भारत करण्याच्या अनुषंगाने प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात सद्य:स्थितीत २ हजार ३७३ रुग्ण क्षयरोगावर उपचार घेत आहेत. या रुग्णांना शासकीय रुग्णालयात मोफत औषधोपचार दिला जात आहे. या रुग्णांच्या खात्यावर दरमहा ५०० रुपये तर मेळघाटातील रुग्णांना साडेसातशे रुपये देण्यात येत आहे, तर काही दानदात्यांकडून पोषण किट देखील काही रुग्णांना देण्यात येत आहे. जिल्ह्यातील ७५०रुग्णांना पोषण किटचा लाभ मिळत आहे.

प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियान, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय राष्ट्रीय धोरणात्मक योजनांतर्गत २०२५ पर्यंत देशाला क्षयरोगमुक्त भारत करण्याचे उद्दिष्ट पुढे ठेवण्यात आले. क्षयरुग्णांना उपचार कालावधीत पुरेसा पोषण आहार मिळाल्यास आजारातून मुक्ती मिळते. त्यामुळे दानदात्यांनी पुढे येऊन या अभियानाला बळकटकरण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकाऱ्यांनी केले आहे. क्षयरोग विभागाच्या माहितीनुसार जिल्ह्यात २३७३ क्षयरोगाचे रुग्ण असून ते नियमित उपचार घेत आहेत. या रुग्णांना दर महिन्याला ५०० रुपयांची मदत तसेच आवश्यक औषधोपचार मोफत केला जात आहे. क्षयरोगातून बरे होण्यासाठी रुग्णांना प्रथिनेयुक्त आहार आवश्यक आहे. त्यासाठी व्यापारी, सामाजिक संस्था तसेच वैयक्तिक दानदात्यांकडून या रुग्णांना पोषण किट पुरविली जाते. जिल्ह्यात ७५० रुग्णांना याचा लाभ मिळतो. दीड किलो डाळ, २५० किलो गहू किंवा ज्वारी, तेल, १ किलो शेंगदाणे दानदात्यांकडून प्रत्येक किटमध्ये देण्यात येते.



# विदर्भाच्या मुद्द्यावरून फडणवीसांनी विरोधकांना सुनावले

## म्हणाले - म्हणून मिरची लागली

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आज बुधवारी (२० डिसेंबर) दहाव्या दिवशी विरोधकांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस उत्तर दिले आहे. तर विरोधकांनी विदर्भाच्या मुद्द्यावरून कोणतीही चर्चा करण्याचा प्रस्ताव मांडला नाही. ज्यामुळे या मुद्द्यावरून देखील त्यांनी विरोधकांना चांगलेच सुनावले आहे. विरोधकांचे विदर्भावरील प्रेम दिसून आले, असा टोला देवेंद्र फडणवीसांनी लगावला. ज्यानंतर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी आक्रमक होऊन आपली बाजू मांडली. ज्यांवर फडणवीसांकडून सडेतोड प्रत्युत्तर विरोधकांना देण्यात आले.

विरोधकांनी विदर्भाच्या मुद्द्यावरून कोणताही प्रस्ताव विधानसभेत मांडला नाही. त्यांना तीन वेळा संधी होती, पण त्यांच्याकडून त्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सांगण्यात आले. ज्यानंतर त्यांच्या या वक्तव्याला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, देवेंद्र फडणीसांनी सांगितले की विदर्भावर आम्ही बोललोच नाही. मी गडचिरोली ते बुलाढाणाच्या प्रत्येक तालुक्याच्या विकासाचा प्लान दिला आहे. त्यावर २९३ वर स्पष्टता मांडली आहे. परंतु, यांचे वित्तमंत्री म्हणाले की विदर्भाचा बॅकलॉग संपला




आहे. सरकारला विदर्भाला न्याय द्यायचाच नाही, हे सरकारने सांगावे. विदर्भावर चर्चा करायला सरकार तयार नाही. हे सरकार विदर्भाच्या विकासाच्या विरोधात आहेत.तर नाना पटोलेंच्या या विधानावर पलटवार करत फडणवीस म्हणाले की, मी वस्तुस्थिती लक्षात आणून दिल्याने त्यांना मिरची लागली. तुम्हाला संधी होती. नागपूरच्या प्रत्येक अधिवेशनात विरोधी पक्ष अंतिम आठवडा प्रस्ताव देताना विदर्भावर देतो. तुम्ही एकतरी दिला का? तुम्हाला तीनवेळा संधी होती. एक ओळ टाकली म्हणजे विदर्भाचा प्रस्तवा होतो का? आता यांना सांगितले म्हणून मिरची लागली. सुनील प्रभू विदर्भावर आक्रमक आहेत. ज्यांनी विदर्भावर अन्याय केला तेच आता आक्रमक आहेत. तुमचा खरा चेहरा उघड झाला आहे, म्हणून मिरची लागली आहे. वरच्या सभागृहात याबाबत चर्चा सुरू आहे. मी यावर उत्तर देणारच आहे, असेही फडणवीस यांच्याकडून यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# इंडिया आघाडीच्या बैठकीत समोसा नव्हता म्हणून जेडीयू खासदार नाराज, म्हणाले...

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली** ५आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजधानी दिल्लीत विरोधकांच्या खछ्अख- आघाडीची चौथी बैठक पार पडली. या बैठकीत विविध मुद्द्यांवर एकमत झाले, पण आता या बैठकीबाबत एक वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. या बैठकीत कोणत्याही गंभीर विषयावर चर्चा झाली नसल्याचा दावा गऊग खासदार सुनील कुमार पिंटू यांनी केला आहे.

### फक्त चहा-बिस्किटावर बैठक संपवली

वृत्तसंस्था एएनआयशी संवाद साधताना सुनील कुमार पिंटू म्हणाले की, या बैठकीला सर्व पक्षांचे बडे नेते आणि मुख्यमंत्री उपस्थित होते, पण यात गंभीर विषयांवर चर्चा झालीच नाही. काँग्रेसने अलीकडेच सांगितले होते की, त्यांच्याकडे निधीची कमतरता आहे. त्यामुळेच ते १३८ रुपये, १३८० रुपये किंवा १३,८०० रुपये देणगी मागत आहेत. म्हणूनच कालची बैठक समोशाशिवाय फक्त चहा आणि बिस्किटांवर संपली. आधीच्या बैठकीत समोसा मिळाला होता.

इंडिया आघाडीच्या बैठकीत या मुद्द्यांवर एकमत

इंडिया आघाडीच्या चौथ्या बैठकीत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि टीएमसीच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी विरोधकांकडून पंतप्रधानपदासाठी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे




यांचे नाव पुढे केले आहे. ममता बॅनर्जींच्या प्रस्तावावर मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, आधी आपण निवडणूक जिंकण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आमचे प्राधान्य जिंकण्यावर आहे. खासदार नसतील तर पंतप्रधान पदाबद्दल काय बोलावे? संख्या वाढवण्यासाठी एकत्र लढून बहुमत मिळवण्याचा प्रयत्न करू. मोदींना प्रचंड गर्व आला आहे की, संपूर्ण जगात मीच एकटा नेता आहे. त्यामुळे आम्ही आधी जिंकण्याचा प्रयत्न करू.

### जागा वाटपाचे काय ?

जागा वाटपाबाबत खर्गे म्हणाले की, सर्वजण एकत्र येऊन काम करणार आहोत. त्या-त्या राज्यात स्थानित नेतृत्व जागावाटपाबाबत एकमेकांशी तडजोड करणार आहे. तसे करता येत नसेल तर आम्ही निर्णय घेऊ. वाद झाल्यास आघाडीचे वरिष्ठ नेते हस्तक्षेप करतील. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, तेलंगणा, बिहार, उत्तर प्रदेशातील समस्या यामुळे सुटतील. दिल्ली आणि पंजाबमध्येही आघाडी होईल आणि तिथली स्थानिक समस्या दूर होईल. दरम्यान, इंडिया आघाडी जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात जागावाटपाबाबत निर्णय घेऊ शकते, अशीही माहिती समोर आली आहे.

# कोरोनाचे रुग्ण सापडत आहेत, घाबरण्याची अजिबात गरज नाही!मात्र दक्षता घ्या

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक मुंबई:** गेल्या काही दिवसापासून कोरोनाचे नवीन रुग्ण राज्यात सापडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये पुन्हा कोरोना आजाराच्या विषयाला घेऊन चर्चा सुरु झाली आहे. केरळमध्ये सापडलेल्या जे एन. १ या नवीन व्हेरियंटच्या पार्शवभूमीवर सर्व जिल्ह्यांना दक्षता घेण्याचे आवाहन राज्याच्या आरोग्य विभागाने केले आहे. राज्यात काही ठिकाणी नवीन रुग्ण सापडत असले तर दक्षता घ्यावी मात्र घाबरण्याची गरज नसल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व लोकांनी आवश्य कतेनुसार गरजेच्या ठिकणी मास्क घालणे, वारंवार हात धुणे व इतर कोविड



योग्य वर्तन गरजेचे असल्याच्या सूचना केल्या आहेत. राज्यात सध्याच्या घडीला एकूण कोरोनाचे एकूण ४५ सक्रिय रुग्ण असून ते विविध ठिकाणी उपचार घेत आहेत. तसेच बुधवारी राज्यात १४ नवीन रुणांची नोंद झाली आहे. यामध्ये मुंबई - ४, ठाणे मनपा -३ , रायगड -१, पुणे मनपा - ४, पिंपरी चिंचवड मनपा - २ रुग्णांचा समावेश आहे. तसेच ४ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. एक रुग्ण अतिदक्षता विभागात असल्याचे आरोग्य विभागाने कळविले आहे.इन्फ्लुएंझा सारखे आजार आणि श्वसन विकाराचा गंभीर संसर्ग असलेल्या रुग्णांच्या चाचण्या करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. तसेच सर्व जिल्ह्यांना कोरोनाच्या चाचण्या वाढविण्याचे सांगण्यात आले आहे.

# माझे कुटुंब माझी जबाबदारी, सगळे टेंडर सोयऱ्यांच्या घरी'

## शिंदेंचा विधानसभेत ठाकरेंवर हल्लाबोल

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराच्या कथा अरेबियन नाईट्समधील कथांपेक्षा भारी आहेत. 'कफन चोर, खिचडी चोर' अशी बिरुदे कमी पडतील एवढा मोठा भ्रष्टाचार कोविड काळात झाला. मुंबई महापालिकेत आदित्य राजाच्या कृपेने वरुण राजाने टेंडरचा पाऊस पाडला. 'माझे कुटुंब माझी जबाबदारी, सगळे टेंडर सोयऱ्यांच्या घरी, बाकी जनतेने फिरावे दारोदार', अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे व आदित्य यांच्यावर बुधवारी विधानसभेत हल्लाबोल केला. धारावीतील मोर्चावरून 'चाहिए खर्चा, निकालो मोर्चा' अशी वृत्ती काहींची आहे, अशी टीकाही मुख्यमंत्र्यांनी केली.

अधिवेशनाचा शेवटचा दिवस मुख्यमंत्र्यांच्या या भाषणानेच गाजला. कोविड काळातील भ्रष्टाचार म्हणजे मयताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.मविआ सरकारच्या काळात मी मराठा उपसमितीचा अध्यक्ष होऊ नये, म्हणून पडद्याआड प्रयत्न झाले. मी अध्यक्ष झालो तर मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी काम करेन, ही भीती त्यावेळच्या अडीच वर्षाच्या मुख्यमंत्र्यांना व अशोक चव्हाणांना होती. मी तेव्हा अध्यक्ष असतो तर आजची परिस्थिती निर्माण झाली नसती हे मी छातीठोकपणे सांगतो, असेही शिंदे म्हणाले.

रस्ते उभारणाऱ्या यूपीतील कंपनीला कोविडची कामे

उत्तर प्रदेशातील हायवे कन्स्ट्रक्शन नावाची कंपनी तळपली. रस्ते बांधणीचे मुख्य काम सोडून 'पॉवर ऑफ टर्नी' देऊन या कंपनीने मुंबई महापालिकेत २७० कोटींची ५७ कंत्राटे घेतली. यात रोमिन छेडा ही महत्त्वाची व्यक्ती आहे.

या कंपनीला जिजामाता उद्यानातील पेंग्विन पार्कचे कंत्राट दिले. ऑक्सिजन प्लान्ट



उभारण्याचे काम दिले आणि तिथून याची सुरुवात झाली. या छेडाचे बोरीवलीत परिहार स्टोअर्स नावाचे कपड्याचे दुकान होते. या कंत्राटात हायवे कंपनीला २ टक्के पैसे देऊन सर्व पैसे छेडा यांच्या खात्यात गेले. जुलैमध्ये ऑक्सिजन प्लान्टचे काम पूर्ण करायचे असताना ते ऑक्टोबरमध्ये पूर्ण केले. पण हे काम एक महिना आधीच म्हणजे ऑगस्टमध्ये पूर्ण झाल्याचे दाखवले. ऑक्टोबर धरला तर कामाच्या विलंबासाठी कंपनीला तीन महिन्यांकरिता ९ कोटी रुपये दंड आकारायला हवा होता, पण प्रत्यक्ष तीन कोटीचा दंड आकारण्यात आला.

ऑगस्टमध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे काम पूर्ण झाल्याचे दाखवले, याच दाखल्याच्या आधारावर पुढचे ८० कोटीचे काम त्याला देण्यात आले, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# शिवसेना आमदार अपात्रता सुनावणी संपली आता नार्वेकरांच्या निकालाचे वेध

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई :** - शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी आज बुधवारी (२० डिसेंबर) रोजी संपली असून, दोन्ही गटाचा युक्तिवाद पूर्ण झाला आहे. दरम्यान आता वेध लागले आहेत ते निकालाचे. तेव्हा १० जानेवारीपर्यंत निकाल देण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश असून, तेव्हा अध्यक्ष काय निर्णय घेतात हे पहावे लागणार आहे.

शिवसेनेतील अभूतपूर्व बंडानंतर राज्यात सत्तांतर झाले. सध्या शिवसेनेत दोन गट असून, शिंदेची शिवसेना सत्तेत आहे. अशातच ठाकरे गटाने दाखल केलेली शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाची याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आधी ३१ डिसेंबरपर्यंत निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. दरम्यान ही वेळ वाढवून देण्यात यावी अशी मागणी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने याला मुदतवाढ देऊन १० जानेवारी २०२४ पर्यंत निकाल देण्याचे निर्देश दिले आहे. याच दरम्यान



विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या समोर मागील तीन महिन्यापासून सुरू असलेली शिवसेना अपात्रता प्रकरणाची सुनावणी आज २० डिसेंबर रोजी पूर्ण झाली असून, आता दोन्ही गटातील आमदारांचे निकालाकडे लक्ष लागले आहे. विधानसभा अध्यक्षांसमोरील सुनावणी पूर्ण झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, याचिका एकत्रित करणे, त्यानंतर शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गट या दोन्ही गटांच्या आमदारांची उलट तपासणी घेऊन साक्ष नोंदवणे आणि अंतिम सुनावणीतील दोन्ही बाजूंचा युक्तिवाद असं करत ही सुनावणी पूर्ण करण्यात आली आहे. या संपूर्ण सुनावणी प्रक्रियेमध्ये दोन्ही बाजूंकडून अनेक दावे-प्रतीदावे, आरोप प्रत्यारोप करण्यात आले. हजारांच्या जवळपास प्रश्न आणि उपप्रश्न दोन्ही बाजूंनी विचारण्यात आले आणि त्यामुळेच या संपूर्ण तीन महिन्यातील सुनावणीमध्ये अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या आहेत.

# धामणगावातील श्रीदत्त मंदिर येथे शिवमहापुराण कथा

## आजपासून पं. सूरज शर्मा करणार भागवत कथेचे वाचन

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे :** श्री दत्त जन्मोत्सव निमित्ताने श्री दत्त मंदिर उत्सव समितीकडून श्री दत्त मंदिर येथे श्री शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. कथावाचक पंडित सूरज शर्मा, महाकालेश्वर धाम उज्जैन यांच्या वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन २१ ते २५ डिसेंबरपर्यंत करण्यात आले आहे. श्री दत्त जयंती उत्सवास २० डिसेंबरपासूनश्री दत्त पारायणाने प्रारंभ झाला, अमर शहिद भगतसिंग चौकातील श्री दत्त मंदिर येथे दत्त जयंती उत्सवामध्ये आज गुरुवारी कलश व शोभा यात्रा काढण्यात आली. श्री शिवमहापुराण कथा उजैन



निवासी पंडित सूरज शर्मा यांच्या ओजस्वी वाणीतून दररोज दुपारी २ वाजता होईल. २४ डिसेंबरला दुपारी १२ वाजता रुद्राक्ष अभिषेक व रुद्राक्ष वितरण होईल. तसेच सोमवार, २५ डिसेंबरला सकाळी १० ते १२ पर्यंत श्री शिवमहापुराण कथा पूर्णाहुती, सायंकाळी ४ वाजता श्रीदत्त पालखीची शोभायात्रा, २६ डिसेंबरला श्री दत्त जन्मोत्सव आरती आणि सायंकाळी ४ वाजतापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. नगरातील भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री दत्त मंदिर उत्सव समितीकडून करण्यात आले आहे.

# दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपये अनुदान; राधाकृष्ण विखे पाटील यांची विधानसभेत घोषणा

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** - सहकारी दूध संघांमार्फत संकलित होणाऱ्या गाईच्या दुधाकरिता दूध उत्पादकास प्रतिलिटर ५ रुपये अनुदान देण्यात येईल, अशी घोषणा दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बुधवारी विधानसभेत केली. ही योजना राज्यातील फक्त सहकारी दूध उत्पादक संस्थांमार्फत राबविण्यात येईल, अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

दूध व दुग्धजन्य पदार्थांचे भाव प्रामुख्याने मागणी व पुरवठा आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटी, बटरचे दर यावर अवलंबून असतात. दूध उत्पादकांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी लवकरच शासन निर्णय काढण्यात येणार आहे. यापूर्वी राज्यातील अतिरिक्त दुधाचे नियोजन करण्यासाठी अनुदान योजना राबविली होती. त्यानुसार शासनाने शेतकऱ्यांचे अतिरिक्त दूध स्वीकारून त्याचे दूध भुकटी व बटरमध्ये रूपांतरण करून अतिरिक्त दुधाचा प्रश्न मार्गी लावला होता, याकडे मंत्री विखे पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

अशा असतील अटी व शर्थी

योजना १ जानेवारी २०२४ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीसाठी लागू राहील. त्यानंतर आवश्यकतेनुसार आढावा घेऊन मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. सहकारी दूध संघाने दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर किमान २९ रुपये दूध दर संबंधित दूध उत्पादक शेतकऱ्याच्या वैयक्तिक बँक खात्यावर ऑनलाइन पद्धतीने अदा करणे बंधनकारक राहील. त्यानंतर शेतकऱ्यांना शासनामार्फत ५ रुपये प्रतिलिटर बँक खात्यावर वर्ग करण्यात येतील. डीबीटी करण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खाते हे त्याच्या आधार कार्डशी व पशुधनाच्या आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक असेल व त्याची पडताळणी करणे आवश्यक राहील.

# सत्ताधाऱ्यांनी अधिवेशन रेटून नेलं

## विरोधकांनी डागली सत्ताधाऱ्यांवर तोफ

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा आज समारोप झाल्यानंतर विरोधी पक्षांनी पत्रकार परिषदेतून सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली. सत्ताधाऱ्यांनी बहुमताच्या बळावर हे अधिवेशन रेटून नेल्याचा आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, सुरुवातीपासूनच आम्ही अधिवेशनाचा कालावधी वाढवावा अशी मागणी करत होतो. पण बहुमताच्या बळावर त्यांनी ती पूर्ण होऊ शकली नाही. खरंतर या अधिवेशनामध्ये आम्ही विरोधक म्हणून सुरुवातीपासूनच आमची भूमिका स्पष्ट केली होती.



या सरकारनं बळीराजाची आणि लोकांची फसवणूक केल्यामुळे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आम्ही चहापाणावर बहिष्कार टाकला होत. खरंतर अधिवेशनाचे कामकाज प्रत्यक्ष दहा दिवसच चालले. पण आमची भूमिका होती की, किमान तीन आठवडे हे अधिवेशन चालावं पण तसे केल्या गेले नाही. एकूणच सदस्यांची अनुपस्थिती जितकी अधिक राहील तेवढा त्याचा फायदा आपल्याला होईल ही भूमिका ठेवून त्यांनी या पद्धतीनं काम केलं असा माझा स्पष्ट आरोप आहे. विधिमंडळाच्या कामकाजाबद्दल आम्ही आक्षेप घेतले. ते सगळ्यांनी पाहिलंय. महाराष्ट्रानी पाहिलंय सरकारनं या सगळ्या प्रकरणामध्ये उत्तर देण्याचं वारंवार टाळलं. कुठल्याही मंत्र्यांचं उत्तर हे सकारात्मक नव्हतं.कसंतरी थातुरमातुर वेळ काढून न्यायचा हा सगळा सरकारचा या मागचा मंत्र्यांचा आणि मुख्यमंत्र्यांपासून सगळ्यांचा एक उद्देश होता. विषय एक आणि उत्तर दुसरं अशी भरकटलेली स्थिती असे चित्र होते. विरोधकांचा केवळ एकच एकच प्रस्ताव येईल अशा पद्धतीची व्यूहरचना सरकारने केली आणि त्यातून विरोधकांना कमीत-कमी चर्चा करायला वेळ मिळेल असं प्लॅनिंग केलं. बहुमत आता स्वाभाविक आहे.

# समाधी मंदिराच्या दिशेने पुष्पवृष्टी करत गाडगे महाराजांना श्रद्धांजली

## शेकडो अनुयायी नतमस्तक : गोपाला गोपाला देवकीनंदनचा जागर

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनाचा जागर करत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कर्मयोगी गाडगेबाबांना श्रद्धांजली अर्पण करताना गायलेल्या गीतासह बारा वाजून वीस मिनिटांनी कर्मयोगी गाडगेबाबांना शेकडो अनुयायांनी समाधी मंदिराच्या दिशेने पुष्पवृष्टी करत श्रद्धांजली अर्पण केली. अतुल रेळे यांनी आपल्या सुमधुर आवाजात श्रद्धांजलीचा कार्यक्रम पूर्णत्वासनेला.संत गाडगेबाबा यांचा ६७ वा पुण्यतिथी महोत्सव गाडगेबाबा नगर येथील समाधी मंदिरावर सुरू आहे. बुधवारी रात्री बारा वाजून वीस मिनिटांनी गाडगे महाराजांना मौन श्रद्धांजली देण्याचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी समाधी मंदिराचे ट्रस्टी बापूसाहेब देशमुख यांनी गाडगे महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यापूर्वी भरत महाराज रेळे, ऋषिकेश महाराज रेळे




यांचे कीर्तन झाले. कीर्तनातून गाडगे महाराजांनी दाखवलेला मानवी कल्याणाचा मार्ग त्यांनी पटवून दिला. बापूसाहेब देशमुख यांनी गाडगेबाबांचे अंतिम जीवन कसं होतं. बाबांचा प्रवास कसा होता यासंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर ठीक १२:२० मिनिटांनी बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो भक्तांनी समाधी मंदिराच्या दिशेने पुष्पवृष्टी करत गाडगे महाराजांना श्रद्धांजली अर्पण केली. दरम्यान गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला गीताचा जागर करण्यात आला. यासह भुसावळ रेल्वे स्थानकावर गाडगे महाराजांना श्रद्धांजली अर्पण करताना तुकडोजी महाराजांनी गायलेलं गीत सुनी खबर की गाडगेबाबा हमको छोड गये याचे सादरीकरण अतुल महाराज रेळे यांनी केलं. यावेळी उपस्थित भजनी मंडळींनी त्यांना चांगलीच साथ दिली. सागर देशमुख, समाधी मंदिराचे व्यवस्थापक प्रकाश महात्मे, हर्षल देशमुख, शुभम बायस्कार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात AICTE प्रायोजित ATAL कार्यशाळा संपन्न

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पी आर पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे एआयसीटी ट्रेनिंग अँड लर्निंग अक्डमीच्या वतीने प्रायोजित नेक्स्ट जनरेशन नॅनो इलेक्ट्रॉनिक सर्किट अँड इट्स अप्लिकेशन या विषयावर कार्यशाळा नुकताच संपन्न झाली.या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. एस. व्ही. डूडल डीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या प्रमुख उपस्थितीत व श्री श्रीकांत पत्करणे तांत्रिक हेड स्पार्टन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. एस. व्ही. डूडल (सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचे डीन, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री श्रीकांत अतकरणे (तांत्रिक विभागाचे प्रमुख, स्पार्टा सॉफ्ट टेक्निकल सोल्युशन, पुणे), संस्थेचे संचालक, प्राचार्य व विभागप्रमुख उपस्थित होते.

कार्यशाळेची सुरुवात कार्यशाळेचे संयोजक प्रा. जी. डी. नागोशे यांनी कार्यशाळे अंतर्गत



घेण्यात येणाऱ्या विविध विषयांची माहिती व त्यासाठी निमंत्रित विविध तज्ञांची सविस्तर परिचय देऊन केली. कार्यशाळेच्या उद्घाटन साठी लाभलेले प्रमुख पाहुणे डॉ. एस व्ही यांनी कार्यशाळेसाठी आयोजित विषयांवर सविस्तर तांत्रिक माहिती व त्याची उपयोगिता पटवून दिली.कार्यशाळेसाठी अनेक मान्यवरांचे योगदान प्राप्त झाले. त्यात प्रामुख्याने आयआयटी इंदोर चे प्रा. डॉ. संतोष विश्वकर्मा यांनी द्वितीय दिवशी कार्यशाळेला संबोधित केले. तसेच कार्यशाळेच्या तृतीय दिवशी तछ्खढ नागपूरचे प्रा. डॉ. गणेश पाटील यांनी VLSI या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यशाळेच्या चतुर्थदिवशी सिनॉप्सीस इंडिया चे इंजीनियर श्री निखिल वैध जे या क्षेत्रातील प्रख्यात तज्ञ आहेत यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या पाचव्या दिवशी औद्योगिक सहलीचाही समावेश करण्यात आलेला होता. कार्यशाळेच्या सर्व सहभागींनी नांदगाव येथील एमआयडीसी मधील रेमंड फॅक्टरी ला भेट दिली शेवटच्या सत्रात तछ्खढ नागपूर चे डॉ राजेंद्र पत्रीकर व रिसर्च स्कॉलर श्री गोपाळ प्रांजळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता सहाव्या दिवशी झालीही कार्यशाळा सहभागी प्राध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक उंची वाढवणारी व त्यांना औद्योगिक व तांत्रिक क्षेत्रात सुरू असलेल्या घडामोडींची इत्यंभूत माहिती देणारी होती असे मत अंतिम दिवशी कार्यशाळेत सहभागी झालेल्या प्राध्यपकानी नोंदविले. कार्यशाळेची सांगता ही उपस्थिततांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आली. या कार्यशाळे यशस्वी आयोजनाकरिता करीता संचालक डॉ डी. टी. इंगोले, डॉ मो. झुहेर, डॉ राहुल घोंगळे, प्रा. गजानन नागोशे , डॉ अक्षय धांदे व विभागातील प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

# पत्रकार नसशील तर बाजूला हो, कशाला प्रश्न विचारतो, चंद्रकांत पाटीलांचा तरुणाला प्रतिप्रश्न

**दि. २१ विदर्भ प्रजासत्ताक पुणे :**

भाजपचे नेते आणि उच्च तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर गेल्या काही महिन्यात दोन वेळा शाई फेकीच्या घटना घडल्या होत्या. या दोन्ही घटनेनंतर ज्या ठिकाणी चंद्रकांत पाटील कार्यक्रमास जातात त्या ठिकाणी अधिकचा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येत असतो, ज्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये.

आज फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या पुस्तक महोत्सवाला चंद्रकांत पाटील यांनी भेट दिली. त्यानंतर त्यांनी पत्रकाराशी संवाद साधत अनेक राजकीय घडामोडींबाबत भूमिका देखील मांडली. दरम्यान अंबेजोगाई येथील ३५ वर्षीय शिवराज मोहन ठाकूर या तरुणाने चंद्रकांत पाटील यांना स्पर्धा परीक्षा देणार्या तरुणांबाबत प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात तू कोण आहेस, पत्रकार नसशील तर बाजूला होण्यास चंद्रकांत पाटील यांनी सांगितले, संबंधित तरुणाची पोलिसांना चौकशी करण्यास सांगितले. पण या प्रकारामुळे चंद्रकांत पाटील यांचे प्रतिक्रिया देतांना लक्ष काहीसे विचलित झाल्याचे पहायला मिळाले.

## नवीन वर्षातील रोजगाराभिमुख संकल्पनेची टेक्नॉलॉजी मुहूर्तमेढ...

# सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इंस्टीटयुट ऑफ टेक्नॉलॉजी एडव्हान्समेंट द्वारे दहा विद्यार्थ्यांना रोजगार



**दि२१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नवीन वर्ष २०२४ अवघ्या काही दिवसांवर आहे. नववर्ष यशस्वी असावे याकरीता अनेकांचे संकल्प आणि नियोजन असतात. मात्र ज्यांचा संकल्प नववर्षापूर्वीच पुर्ण होतो त्यांच्या संकल्पनेची महुर्तमेढ यशस्वी होत जाते. प्रत्येक विद्यार्थ्यांना रोजगार हे ध्येय जोपासणाऱ्या सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट द्वारे महाविद्यालयाची रोजगाराभिमुख संकल्पनेची मुहूर्तमेढ नववर्षापूर्वी रोवली गेली. नुकताच महाविद्यालयात मुंबई येथील नामांकीत इंडिया मार्ट इंटरमेश प्रा. लि. चा कॅम्पस ड्राईव्ह (रोजगार निवड प्रक्रीया) पार पडला. गृप डिस्कशन, इंटरव्युव व एचआर इंटरव्युव अशी निवड प्रक्रीया राबवित २०२४ मध्ये एमबीए उत्तीर्ण होणाऱ्या १० विद्यार्थ्यांची यशस्वी निवड करण्यात आली. मंगळवार दि.१९ डिसें २०२३ रोजी महाविद्यालयात आयोजीत सोहळ्यामध्ये नोकरीचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

शिवाई एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल टस्ट्र द्वारे संचालीत सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इंस्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी एडव्हान्समेंट महाविद्यालय, अंबा बिझनेस पार्क रहाटगाव येथे पार पडलेल्या नोकरी प्रमाणपत्र वितरण सोहळयाला व्यासपीठावर शिवाई एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल ट्रस्ट च्या अध्यक्षा डॉ. स्मिता सूर्यवंशी, सचिव प्रा. दिनेश सुर्यवंशी, कोषाध्यक्ष प्रा. अभय सुर्यवंशी, महाविद्यालय संचालक डॉ. पल्लवी मांडवगडे, महाविद्यालयाचे डायरेक्टर इंटस्ट्रीज रिलेशन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. अमोल करमरकर आदी मान्यवर उपस्थित होते. या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये पी.आर पोटे अभियांत्रिकी महाविद्यालयातील कुणाल विनायक बावने, आदर राजेंद्र वानखडे, वेदांत उमप, राज संतोष पोकळे, श्रेयांश गोपाल म्हाला, भावेश अनिल गुगलीया, सौरभ राजेंद्र गायकवाड, असित रविंद्र सदाशिव, अमन बिपीनराव बेले व तर संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग शेगाव महाविद्यालयाचा प्रविण श्रीकृष्ण काळे असे एकुण दहा विद्यार्थ्यांना रोजगार प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. प्रवीण ठोंबरे, प्रा. अक्षय उंबरकर, प्रा. संयुक्ता गाठेकर, प्रा. रोहण देशमुख यांचे सह शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या रोजगारासाठी नोडल सेंटर : प्रा. दिनेश सुर्यवंशी

आज अनेक उच्च तंत्र व अभियांत्रिकी महाविद्यालयाद्वारे विद्यार्थ्यांच्या रोजगारावर भर दिला जातो मात्र तो केवळ



महाविद्यालया पूरताच असतो. आज उच्च सुशिक्षीतांची संख्या ज्या वेगाने वाढत आहे त्याच वेगाने रोजगार क्षेत्र सक्षम होणे अपेक्षीत होते. वर्तमान औद्योगिक क्षेत्रात रोजगाराच्या अपेक्षा या कौशल्य प्रधान असून त्यामध्ये दरदिवशी अद्ययावत बदल होत आहे. त्या अनुषंगाने सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इस्टीटयुट ऑफ टेक्नॉलॉजी एडव्हान्समेंट महाविद्यालय पश्चिम विदर्भासाठी आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संगलग्न महाविद्यालयांसाठी रोजगार, प्रशिक्षण, रोजगाराभिमुख शैक्षणिक उपक्रम म्हणून एक नोडल सेंटर द्वारे काम करीत आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक गरजेनुसार कौशल्य प्रधान करीत सक्षम करीत आहे. आज दहा विद्यार्थ्यांना मिळालेला रोजगार यशस्वी संकल्पपूर्तीचा आनंद असल्याचे मत शिवाई एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल टस्ट्र चे सचिव प्रा. दिनेश सुर्यवंशी यांनी व्यक्त केले.

# आत्महत्येचा विचार आला; या नंबरवर तातडीने करा कॉल

## १०४ नंबरवर मोफत समुपदेशनाची सेवा उपलब्ध

**दि२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

बेरोजगारी, कौटुंबिक हिंसाचार, छळ, आजार व नैराश्यातून आत्महत्या करण्याचे प्रकार वाढले. आहेत. नैराश्याने ग्रासलेल्या व्यक्तीचे समुपदेशन करण्यासाठी १०४ हा टोल. फ्री क्रमांक उपलब्ध करून दिला आहे.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर युवकांना बेरोजगारीचा सामना करावा लागते. अशावेळी त्याच्यासमोर आत्महत्येचा विचार येते. विशेष करून कौटुंबिक हिंसाचारादरम्यान आत्महत्या अधिक प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. तसेच प्रेमभंग झाल्यामुळेही काही जण आत्महत्या करतात. आत्महत्या करण्याच्या निर्णयापर्यंत पोहोचण्यापूर्वी संबंधित व्यक्तीच्या वागणुकीमध्ये बदल झाला असतो, हे नातेवाइकांना ओळखता आले



पाहिजे. त्या व्यक्तीचे समुपदेशन करण्यासाठी १०४ या क्रमांकावर संपर्क साधावा. जेणेकरून तो व्यक्ती आत्महत्येपासून परावृत होईल.

**आत्महत्येचे विचार येताच करा कॉल**

आत्महत्येचा विचार मनात येत असेल तर तत्काळ १०४ या क्रमांकावर संपर्क साधावा. मोफत समुपदेशन उपलब्ध होते. संबंधित व्यक्तीच्या हावभावामध्ये बदल झाला असते. हे नातेवाइकांना वेळीच ओळखता येणे अतिशय महत्त्वाचे आहे.

**आशांकडून सर्वेक्षण**

आशा सेविकांकडून अधूनमधून सर्वेक्षण करून कुटुंबातील सर्व सदस्यांची माहिती जाणून घेतली जाते. यामध्ये नाव, वय, लिंग, साथीचे आजार, मानसिक आजार ही माहिती संकलित केली जाते. नंतर ही माहिती वरिष्ठांकडे पाठविली जाते.

**उपचारासाठी रुग्णालय गाठा**

१०४ या क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर तेथील समुपदेशक केवळ समुपदेशानाचे काम करतील. मात्र औषधांची किंवा शारीरिक तपासणीची गरज पडल्यास संबंधित व्यक्तीला जवळपासच्या रुग्णालयातच जावे लागेल. साधने वाढली असली तरी माणसाने आपली गतीसुद्धा वाढविली आहे. अपेक्षांचे ओझे माणसाला झोप घेऊ देत नाही. त्यातूनच नैराश्य निर्माण होते.

# २३ व२४ डिसेंबर रोजी निर्मिती पब्लिक स्कूल मध्ये भव्य स्नेहसंमेलनाचे आयोजन

## अनेक मान्यवरांची राहणार उपस्थिती

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**

विद्यार्थी यांचे आरोग्य चांगले राहले पाहिजे स्पर्धा युगामध्ये प्रत्येक स्पर्धेत त्याने भाग घेतला पाहिजे या करिता अमरावती जिल्हातील चांदुर बाजार तालुक्यातील निर्मिती पब्लिक स्कूल मध्ये भव्य स्नेहसंमेलनाचे आयोजन दि २३ व २४ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे या कार्यक्रमाला प्रमुख



उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध वक्ते राजेश मिरगे उपस्थित राहणार आहे तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार गीतांजली गरड, ठाणेदार सूरज बोंडे, भास्करराव टोम्पे अध्यक्ष टोम्पे कॉलेज चांदुर बाजार , विजयराव टोम्पे, मुख्याध्यापक तुषार खोंड, जेष्ठ पत्रकार सुरेश सवळे, पत्रकार सागर सवळे, पत्रकार सुयोग गोरले आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे कार्यक्रमचे आयोजन दुपारी ४ ते ८ वाजेपर्यंत राहणार आहे या स्नेहसंमेलनाचे आयोजन निर्मिती पब्लिक स्कूल चांदूरबाजार तर्फे करण्यात आले आहे.

# हिवाळ्यात आपल्या दारी आला सुदृढ आरोग्याचा खजिना

## आवळा, पेरू, पपई, बोर, संत्री बाजारात मुबलक प्रमाणात उपलब्ध

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

हिवाळ्याला हेल्दी सीजन असे म्हटले जाते. कारण या दिवसात शरीराची पचनशक्ती वाढते. आणि शारीरिक स्वास्थ वाढविण्यासाठी हे दिवस अमृताप्रमाणे मौल्यवान असतात. या दिवसात निसर्ग बहरून आलेला असतो. निसर्गाने फळाच्या रूपात तशी व्यवस्थाच सर्वांसाठी उपलब्ध करून दिली आहे. मात्र आपण या फळांचा वापर केवळ आजारी पडल्या नंतरच करतो. त्याचा वापर उत्तम आरोग्य असताना केला तर त्याचा मानवी आरोग्याला फायदा होईल, असे मत आरोग्य तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.



फळांमध्ये सर्वाधिक फायबरचे प्रमाण आहे. फायबर हा तंतुमय पदार्थ आहे. यात शरीरातील आतड्यांना स्वच्छ करण्याचे काम केले जाते. आतड्यातील मळ यातून स्वच्छ होतो. शरीरातील कॉलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी करण्यात मोलाचा हातभार लागतो. यातून पचन चांगले होण्यास मदत होते. रोगप्रतिकारशक्ती वाढविण्याचे काम फळाच्या माध्यमातून होते. प्रत्येक फळात विपुल प्रमाणात खनिज आहेत.

**थंडीत कुठली फळे खावी**

प्रत्येक फळाचे वेगळे वैशिष्ट्य आहे. या फळाचा शरीराला तंदुरुस्त बनवून ठेवण्यास मोलाचा हातभार लागतो.थंडी मध्ये आवळा,पेरू,पपई,संत्रा, मोसंबी,आणि बोर ही फळे खावीयामुळे सर्वांगाने सुदृढ बनविणारा खजिना दारावर आल्यानंतर आपण त्याकडे दुर्लक्ष केले तर दवाखान्याच्या येरझारा माराव्या लागणार आहेत.

**फळांचे भाव काय**

बाजारात फळांचे दर ४० ते ६० रुपये किलो दरात बाजारातील फळे विक्रीसाठी आलेले आहेत. सर्वाधिक बलवर्धक मानला जाणारा आवळा या ऋतूत बाजारात येतो. संत्रा, मोसंबी, पेरु, बोर, पपई, सीताफळ ही फळे बाजारात आली आहेत.

# सर्व जिल्ह्यांना अलर्ट! कोरोनाच्या नव्या व्हेरियंटचा सिंधुदुर्गात रुग्ण

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

देशात सर्वप्रथम 'जेएन. १' या ओमिक्रॉनच्या (कोरोना) व्हेरियंटचा रुग्ण केरळमध्ये सापडल्यानंतर आता महाराष्ट्रातही एक रुग्ण आढळला आहे. सिंधुदुर्गमध्ये ४१ वर्षांच्या पुरुषालाही या व्हेरिएंटची लागण झाली आहे. या नवीन व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर सर्व जिल्ह्यांना दक्षता घेण्याचे आदेश राज्याच्या आरोग्य विभागाने दिले आहेत. तसेच याची सौम्य लक्षणे असून,



तो बरा होतो, असेही आरोग्य विभागाने म्हटले आहे. केरळमध्ये सर्वप्रथम ७९ वर्षांच्या महिलेला या 'जेएन.१' विषाणूची लागण झाली होती. आता ती महिला पूर्णपणे बरी झाली आहे. 'जेएन.१' हा ओमिक्रॉन व्हेरियंटचा उपप्रकार असून, यामुळे रुग्णांमध्ये सौम्य प्रकारची लक्षणे आढळून येत आहे. त्यामुळे या व्हेरियंटची भीती बाळगण्याची गरज नाही. तथापि कोविड प्रतिबंधासाठी आवश्यक दक्षता घेण्याची गरज आहे, असे आरोग्य विभागाने म्हटले आहे.

# साहेब, आता तुम्हीच सांगा पीक वाचविण्यासाठी आम्ही काय करावे?

## वन्यप्राणी शेतातून जाईच ना : वनविभागाने कायमस्वरुपी बंदोबस्त करावा शेतकऱ्यांची मागणी

**अरुण जोशी**

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

वन्यप्राण्यांकडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत पिकांची नासधूस करण्यात येत असल्याने हाती आलेले पीक पूर्णतः उद्ध्वस्त झाले आहे. शेतपिकांच्या रक्षणासाठी वेळप्रसंगी शेतकऱ्यांचा जीव धोक्यात आला आहे. मात्र पिकांना जपण्यासाठी जीवाची पर्वा न करणाऱ्या शेतकऱ्यांबाबत शासकीय यंत्रणेला काहीही देणेघेणे वाटत नाही. याबाबत शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.



जिल्ह्यातील अनेक तालुक्यात बहुतांश भाग झुडपी जंगलांनी व्यापला आहे. याठिकाणी वन्यप्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असतो. शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत वन्यप्राणी शेतात दिवसा धिंगाणा घालत असल्याने हाती आलेले पीक वन्यप्राणी उद्ध्वस्त करतात,

वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, यासाठी शेतकऱ्यांनी अनेकदा वनविभागाकडे तक्रारी केल्या. मात्र वनविभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी याकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केल्यामुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता रात्रीच्या सुमारास पिकांची राखण करण्याची दुर्दैवी वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. याकडे अजून कोणत्याही लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांची समस्या जाणून घेऊन यावर कायमस्वरूपी उपाययोजना केली नाही. हे शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. शेतीचे वन्यप्राण्यांकडून नुकसान झाले तर वनविभागाचे अधिकारी पिकांचा पंचनामा करून मोकळे होतात. मात्र त्याचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होताना दिसत नाही. वन्यप्राण्यांना मारता येत नाही, असा कायदा आहे. मात्र वन्यप्राणी दिवसागणिक शेतीचे नुकसान करतात यावर शासकीय यंत्रणा बोलायला तयार नाही.

उद्याचे स्वप्न डोळ्यात साठवून शेतकरी जीवाची पर्वा न करता शेतपिकांची राखण करीत आहे. याकडे वनविभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वनविभागाकडे केली आहे.

### एका रात्रीतून पिके करतात उद्ध्वस्त

वन्यप्राणी शेतकऱ्यांवर जीवघेणे हल्ले करतात. त्यावर केवळ थातूरमातूर बंदोबस्त करून चालणार नाही तर मानव-वन्यप्राणी संघर्षावर ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. सध्या शेतात कापूस, चणा, गहू, तूर, ज्वारी ही पिके डौलाने उभी आहेत, मात्र वन्यप्राणी पिकांची एका रात्रीतून वाट लावत आहे. गेल्या ३० वर्षापासून सुरु असलेला शेतकऱ्यांचा संघर्ष आजतागायत सुरू – आहे. मात्र वन्यप्राण्यांच्या बंदोबस्त करण्यासाठी अजूनही प्रशासनाने ठोस उपाययोजना केली नाही हे शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे.

### कायमस्वरुपी बंदोबस्त करा; तोकडी मदत नको

वन्यप्राण्यांनी शेताचे नुकसान केल्यास वनविभाग शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून मदत करतात. परंतु ही पाचशे ते एक हजार रुपयांची तोकडी मदत देऊन शेतकयांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम प्रशासन करीत आहे. त्यामुळे आम्हाला नुकसानभरपाई नको, वन्यप्राण्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करा, अशी मागणी भातकुली तालुक्यातील शेतकयांनी केली आहे.

शेतात सध्या खरीप व रब्बी हंगामातील पिके उभी आहेत. परंतु वन्यप्राणी भरदिवसा शेतातील पीक डोळ्यांदेखत उद्ध्वस्त करीत आहेत. नाईलाजाने शेतकरी जीव धोक्यात घालून पिकांना संरक्षण देत आहे. याकडे वनविभागाने लक्ष देऊन वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा मंगळवारी मी शेतात असतांना रानडुकराने माझ्या वर हल्ला केला यात मी गंभीर जखमी झालो आहे.

**बापूराव पवार जखमी शेतकरी**

# शैक्षणिक अभ्यासक्रमात निवडणूक प्रक्रियेचे धडे

## केंद्रीय शिक्षण मंत्रालय, निवडणूक आयोग यांच्यात करार

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

देशातील निवडणूक प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच जागरूक करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि भारत निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला असून,त्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता या विषयी अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने अर्थातच युजीसी ने दिले आहेत. युजीसी चे सचिव मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिध्द केले आहे. विद्यार्थ्यांना लोकशाही, मतदान आदी प्रक्रिया समजावून सांगण्यासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करणे,त्यासाठीचे श्रेयांक निश्चित करणे,वयाची १७ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा मतदारनोंदणीसाठी संस्थास्तरावरील आराखडा तयार करून ' एआयएसएसई ' आणि ' यू-डायस' संकेतस्थळाला जोडणे ,संबंधित विद्यार्थ्यांची मतदारनोंदणी करणे,अध्यापनासाठी शिक्षक-प्राध्यापकांना ऑनलाइन किंवा ऑफलाईन पद्धतीने प्रशिक्षित करणे,विद्यार्थ्यांमध्ये मतदान आणि त्याबाबत प्रक्रियेबाबत जागरूक करण्यासाठी अभियान राबविण्या संदर्भातील सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेमध्ये,विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र,भारतीय निवडणूक आयोगाचे मोबाईल उपयोजन,बलेट युनिट,मतदान विभाग,नियंत्रण विभाग,पीठासीन अधिकारी, दोन मतदान अधिकारी, पोलिंग एजंट,मतदान कप्पे आदीबाबांतची माहिती दिली जाईल.निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देऊन जागरूक करण्याचा उद्देश आहे.

# सूप वाजलं' म्हणजे काय? अधिवेशनाची सांगता झाल्यावर हा वाक्प्रचार का वापरतात?

**दि. २१ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

मराठी भाषा म्हणजे मोठा विलक्षण प्रकार आहे. तसं तर भाषा म्हणजेच एक विलक्षण प्रकार आहे. कारण आपण उच्चारत असलेला प्रत्येक शब्द हा कुठल्या ना कुठल्या कारणामुळे त्या अर्थाला येऊन पोहोचलेला असतो. मनुष्यप्राण्यानं संवाद करण्याची सुरुवात हावभाव, मग त्याला जोड वेगवेगळ्या आवाजांची आणि त्यानंतर हळूहळू या दोन्ही गोष्टींनी मिळून अवतरलेल्या शब्दांपर्यंत हा 'संवादप्रवास' येऊन पोहोचला. यानंतरही त्यात वेगवेगळ्या लिपी आणि चिन्हांद्वारे नवनवे प्रयोग होतच राहिले. पण शब्द हा संवादाचा मूलभूत आधार राहिला. त्यामुळे आज आपण वापरत असलेल्या असंख्य शब्द, म्हणी, वाक्प्रचारांचाही जन्म अशाच एखाद्या क्रियेशी निगडित अर्थातूनच झालेले असतात. असाच एक वाक्प्रचार म्हणजे 'सूप वाजलं'!

**कुठे वापरला जातो हा वाक्प्रचार?**

आपण बऱ्याचदा 'सूप वाजलं' हा वाक्प्रचार ऐकतो. नुकतंच राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन पार पडलं. यावेळी बातम्यांच्या मथळ्यामध्ये किंवा माहितीमध्ये 'अधिवेशनाचं सूप वाजलं' अशी वाक्य आपण ऐकली असतील. शिवाय दरवर्षी होणारी मराठी साहित्य संमेलने जेव्हा आटोपतात, तेव्हा त्यावेळीही 'साहित्य संमेलनाचं सूप वाजलं' असा शब्दप्रयोग केला जातो. अनेकदा लग्नकार्यावेळीही कार्य पार पडल्यानंतर 'सूप वाजलं' म्हणण्याचा प्रघात आहे.

# रिमोटवर चालणारा ट्रॅक्टर, आता ड्रायव्हरशिवाय शेताची नांगरणी होणार आहे

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

तुम्हीही ट्रॅक्टरच्या साहाय्याने तुमच्या शेतात नांगरणी करत असाल, पण त्यावर बसून शेतीची कामे करायला तुम्हाला आवडत नसेल, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. वास्तविक, KITS वरंगलने एक ऑटोमॅटिक ट्रॅक्टर बनवला आहे, जो रिमोट कंट्रोलने चालेल.



आजच्या आधुनिक काळात शेतकऱ्यांनी शेतीतून अधिकाधिक फायदे मिळवण्यासाठी प्रगत व आधुनिक तंत्र व यंत्रांचा अवलंब करणे गरजेचे झाले आहे. आता नवीन यंत्रांशिवाय शेती करणे फार कठीण आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. कारण शेतीचे मोठे आणि अवघड काम वेळेत पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना मशिनची गरज असते. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी, कंपन्या नेहमी त्यांच्या उत्पादनांमध्ये काही बदल करतात आणि बाजारात आणतात. या मालिकेत, काकतिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स, वारंगल (KITS-W) ने आता शेतकऱ्यांच्या सोयीसाठी एक उत्तम ट्रॅक्टर तयार केला आहे. जो ड्रायव्हरलेस ऑटोमॅटिक ट्रॅक्टर आहे.

KITS, वारंगलच्या संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक डॉ. पी निरंजन म्हणतात की या प्रकल्पासाठी सुमारे ४१ लाख रुपये देण्यात आले होते. दुसरीकडे, प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक एमडी शरफुद्दीन वसीम सांगतात की, हा ट्रॅक्टर शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे सोयीचा आहे. शेत नांगरणीपासून ते इतर अनेक कामे केली जाणार आहेत. याचा वापर केल्यास शेतकऱ्यांचा वेळ वाचेल आणि त्याचबरोबर फारसा पैसाही खर्च होणार नाही.

**रिमोट कंट्रोल ट्रॅक्टर :**

हा ट्रॅक्टर रिमोट कंट्रोल ट्रॅक्टर आहे. हा ट्रॅक्टर शेतकरी बांधव सहज चालवता येईल अशा पद्धतीने तयार करण्यात आला आहे. या ट्रॅक्टरमध्ये शेतकरी एका ठिकाणाहून न बसता गाडी चालवू शकतो.

तुम्ही संगणकावर गेम खेळता त्याप्रमाणे शेतकरी ते चालवतील. या ट्रॅक्टरमध्ये एक अँड्रॉइड ॲप्लिकेशन असेल, जे ते पूर्णपणे ऑपरेट करेल. तज्ज्ञांनी या ट्रॅक्टरमध्ये जीवसृष्टीची माहिती गोळा करण्यासाठी सेन्सरही दिले आहेत. हे अनेक प्रकारची कामे काही मिनिटांत करेल. उदाहरणार्थ, ते शेतीच्या जमिनीतील ओलावा आणि तापमान इत्यादी ओळखण्यास सक्षम असेल. जेणेकरून जमिनीतील उणीव दूर करून शेतकरी चांगल्या पद्धतीने शेती करू शकतील. सध्या या रिमोट कंट्रोल ट्रॅक्टरच्या किमतीबाबत कंपनीकडून कोणतीही माहिती शेअर करण्यात आलेली नाही. ते शेतकऱ्यांच्या हातात कधी येईल, हेही सांगण्यात आलेले नाही.

# राज्यासह जिल्ह्यात दोन टप्प्यांनुसार 'अभय' योजनेची अंमलबजावणी सुरू

## सुमारे ५०० कोटींपेक्षा अधिक महसूल मिळण्याची अपेक्षा : अनोंदणीकृत प्रकरणांची संख्या देखील जास्त

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यात मुद्रांक शुल्क न भरलेल्या किंवा कमी मुद्रांक शुल्क भरलेल्या प्रकरणात दिलासा देण्यासाठी ' अभय ' योजना राबवण्याचा निर्णय घेतला. राज्यभर या योजनेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार या प्रकारात दोन ते अडीच लाख दस्त असून ,या दस्तनोंदणीच्या मुद्रांक शुल्क आणि दंडाच्या माध्यमातून सुमारे ५०० ते ६०० कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे. याशिवाय अनोंदणीकृत प्रकरणांची संख्यादेखील जास्त आहे. त्यामध्ये सुद्धा मुद्रांक शुल्क कमी नागरिकांकडून वसूल करण्यात येणार आहे. महसुलात वाढ व्हावी, थकीत महसुलाची वसुली व्हावी, या उद्देशाने मंत्रिमंडळ बैठकीमध्ये 'अभय' योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



त्यानुसार १ जानेवारी १९८० ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीसाठी ,तर १ जानेवारी २००१ ते २०२० या कालावधीतील दस्तांसाठी अशी दोन गटांसाठी स्वतंत्र योजना असणार आहे.१ डिसेंबरपासून ३१ जानेवारी २०२४ आणि १ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ अशा दोन टप्प्यांत ही योजना राबविण्यात येणार आहे. या ' अभय' २००१ पूर्वीचा दस्त असेल आणि त्यांचे थकीत मुद्रांक शुल्क आणि दंडाची रक्कम एक लाख रुपयांच्या आत असेल,तर त्यांना मुद्रांक शुल्कात आणि दंडात पूर्ण माफी मिळणार आहे. तर एक लाख रुपयांच्या वरील मुद्रांक शुल्क थकीत असेल,तर त्यांना मुद्रांक शुल्काच्या रकमेत २५ टक्के आणि दंडाची रक्कम २० टक्केच भरावी लागणार आहे. दुसऱ्या गटात म्हणजे २००१ ते २०२० या कालावधीतील २५ लाखांच्या आतील मुद्रांक शुल्क थकीत असेल,तर अशा दस्तांना मुद्रांक शुल्क २० टक्के भरावा लागणार असून दंडाची रक्कम १० टक्केच भरावी लागणार आहे. या कालावधीतील दस्त असेल आणि थकीत मुद्रांक शुल्काची रक्कम २५ लाखांच्या वर असेल,तर अशा दस्तांना सरसकट २५ लाख रुपये दंड आणि मुद्रांक शुल्काची २० टक्केच रक्कम भरावी लागणार आहे. दरम्यान, दंडाच्या रकमेत सुटदेखील देण्यात येणार आहे. दरम्यान,१९८० पासूनचे या प्रकारचे सुमारे २ लाख ५० हजारांहून अधिक दस्त असण्याची शक्यता आहे. काही अर्धवट नोंदणी झालेले किंवा केवळ १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोंदणी केलेले दस्त असल्यास त्या दस्तांनादेखील मुद्रांक शुल्क भरून नियमित करण्याची सोय उपलब्ध करून देण्याची सोय म्हणजेच ' अभय' योजना आहे. राज्यात ' अभय ' योजना नुकतीच सुरू करण्यात आली असून ,आतापर्यंत राज्यात १७० प्रकरणे दाखल झाली आहेत.त्यापैकी २० प्रकरणांवर निर्णय झाला असून, १३ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे. निकाली काढलेल्या प्रकरणात अभय योजनेच्या माध्यमातून १५ लाख १८ हजार ३७२ रुपयांचा महसूल मिळाला आहे. अजून प्रकरणे दाखल होण्याची संख्या वाढत आहे.महाराष्ट्र शासन सह जिल्हा निबंधक वर्ग -१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ,अमरावती अनिल औतकर यांनी दिली.

# गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त राधानगरात महाप्रसाद दिंडीचे स्वागत, दहीहंडी,काला- साईराम मंडळाचे आयोजन

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राधानगर येथील साईराम मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त गुरुवार दिनांक २१ रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.हजारो भाविकभक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त निघालेल्या दिंडीचे स्वागत साईराम मंडळामार्फत करण्यात आले.याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते नितीन तालन यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले व दहीहंडी फोडण्यात आली. त्यानंतर महाप्रसाद कार्यक्रमास प्रारंभ झाला.परिसरातील हजारो भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुशील चौधरी,योगेंद्र तालन, मनोहर घुले,माणिकराव घुले, राजाभाऊ तालन,अरुण नांदगावकर, अशोक मिसाळ,मोहनीश मिसाळ,निखिल मिसाळ,हर्षद चौधरी,जयप्रकाश घुले,राजाभाऊ घुले, विकी घुले,दिनेश घुले, पवन तालन,विजय देशमुख, राजू विधले, संदीप ठाकरे, नाना उमेकर शेखर काळे, राजाभाऊ काळे, प्रशांत खरे, मनोरे काका,संजय साखरे,मोनू गायकवाड,शशी नाथे बंटी काळे, महेश माधुगडिया,सुनील खताडे, हेमंत ठाकरे,प्रमोद महल्ले,राहुल हाडोळे, संजय बनारसे, राजूभाऊ खवले, रमेश बिजवे तुळशीरामजी चौधरी, विजय किल्लेकर,प्रवीण चौधरी, राहुल मानकर,राजेश भालेराव,महेंद्र किल्लेकर,लक्ष्मण वाडकर,गाढवे काका,मनोज बेले, तन्मय मोहोड ,दुर्गेश किल्लेकर,राजेश विघे आदींनी परिश्रम घेतले.



# 'ईव्हीएम व व्हीव्हीपॅट' प्रात्यक्षिक केंद्राचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे हस्ते शुभारंभ

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रणा मतदारांना अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या ईव्हीएम प्रात्यक्षिक सेंटरचे उद्घाटन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते आज करण्यात आले. मतदारांनी या यंत्रणेची प्रात्यक्षिके पाहून शंकानिरसन करून घ्यावे, असे आवाहन सौरभ कटियार यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अमरावती येथे 'ईव्हीएम व व्हीव्हीपॅट' प्रात्यक्षिक केंद्राचे शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी सूरज वाघमारे, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी रिचर्ड यानथन, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पी.एम. मिनू, उपजिल्हाधिकारी रणजीत भोसले, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, प्रदीप पवार, मनोज लोणारकर, रविंद्र जोंगी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांच्यासह गटविकास अधिकारी व तहसिलदार उपस्थित होते.



लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून अमरावती जिल्ह्यातील सर्व आठ मतदार संघामध्ये ईव्हीएम व व्हीव्हीपॅट पुरविण्यात आलेल्या आहेत. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक मतदार संघाचे मुख्यालयी ईव्हीएम डेमॉन्स्ट्रेशन सेंटर उघडण्यात आले असून ईव्हीएम मशीन्स प्रात्याक्षिक करण्यासाठी उपलब्ध असणार आहेत. तसेच प्रत्येक मतदार संघामध्ये प्रसिध्दीसाठी दोन मोबाईल डेमॉन्स्ट्रेशन व्हॅन देण्यात आल्या आहेत.

मतदारांना मतदान यंत्रांची प्रक्रिया स्वत: बघावी प्रारूप मतदान करून त्यांनी केलेले मतदान व्हीव्हीपॅट यंत्राद्वारे पडताळून बघता यावे, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्रणेबाबत सर्व शंकाचे निरसन करता यावे, या उद्देशाने मतदान यंत्र मोबाईल डेमॉन्स्ट्रेशन व्हॅन गावोगावी फिरून जनजागृती करणार आहे.नागरिकानी जनजागृती मोबाईल डेमॉन्स्ट्रेशन व्हॅनच्या माध्यमातुन प्रारूप मतदान तसेच ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्रणेबाबत असणाऱ्या सर्व शंकाचे निरसन करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

# तिहेरी हत्याकांडाने ठाणे हादरले; तरुणाने पत्नीसह केली दोन मुलांची हत्या

**दि. २१ विदर्भ प्रजासत्ताक ठाणे :**

घोडबंदर येथील कासारवडवली भागातील एका चाळीतील खोलीत एका तरुणाने पत्नी आणि दोन मुलांच्या डोक्यात क्रिकेटच्या बॅट मारुन त्यांचा खून केल्याचा प्रकार गुरुवारी उघडकीस आला. या तिहेरी हत्याकांडाने शहर हादरले आहे. या हत्येमागचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नसून याप्रकरणाचा तपास कासारवडवली पोलिस करीत आहेत. भावना अमित बागडी (२४), खुशी अमित बागडी (६) आणि अंकुश अमित बागडी (८) अशी मृतांची नावे आहेत. तर, अमित धर्मवीर बागडी (२९) असे आरोपीचे नाव आहे. तो मुळचा हरीयाणा राज्यातील इसार जिल्ह्यातील खरडालीपुर गावचा रहिवाशी आहे. अमित याला दारु पिण्याचे व्यसन जडले होते. या कारणास्तव त्याची पत्नी भावना हि त्याला सोडून गेली होती. ती दोन मुलांना घेऊन त्याचा भाऊ विकास याच्या घरी राहत होती. तीन दिवसांपुर्वी अमित हा भावना आणि दोन मुलांना भेटण्यासाठी विकासच्या घरी आला होता. गुरूवारी सकाळी विकास हा कामावर गेला. त्यावेळी अमित याने पत्नी भावना आणि दोन मुले खुशी व अंकूश यांच्या डोक्यात क्रीकेट बॅट मारून त्यांचा खून केला.